तुमच्या जिभेला द्या चव...आणि भोजनाचा घ्या आनंद...
स्वादिष्ट.. रुचकर राजस्थानी थाळी
लोकसेवा प्युअर व्हेज
एम.जी.रोड,अहमदनगर. फोन : 2327060, 9850799850



संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

साऊथ इंडियन/पावभाजी/पंजाबी डिशेस/ छोले भटूरे/पावभाजी/मिल्कशेक
खवय्यांसाठी खास पंजाबी
छोले भटूरे
Sambar
PURE - VEG | Aromas of South !
Restaurant Timing 8 AM to 11 PM
पार्सल सुविधा उपलब्ध..
एल.जी.शोरूम समोर, नगर-मनमाड रोड, सावेडी, अहिल्यानगर. मो.- 85306 40202

रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, मंगळवार दि. २८.१०.२०२५ | अंक नं. १७१ | वर्ष ६८ वे | दैनिक वर्ष ६२ वे | ANR/022/2018-2020

# सराफ बाजारातून दोन किलो सोने घेवून सहा परप्रांतीय कारागीर नगरमधून पसार

## ८ सराफांचा केला विश्वासघात, १ कोटी रुपयांचा मुद्देमाल गायब, गुन्हा दाखल, पोलिसांकडून शोध सुरु

नगर – शहरातील गजबजलेल्या सराफ बाजारातून तब्बल दोन किलोपेक्षा अधिक सोने घेऊन ६ परप्रांतीय कारागीर बेपत्ता झाल्याची घटना उघडकीस आली आहे. या घटनेमुळे सराफ व्यावसायिकांमध्ये प्रचंड खळबळ उडाली आहे. सदर सोन्याची किंमत १ कोटी रुपये असून हे सोने ८ सराफांचे होते. या प्रकरणी २७ ऑक्टोबर रोजी कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत कृष्णा जगदीश देडगावकर (वय ३२, रा. गायकवाड कॉलनी, सावेडी रस्ता) यांनी फिर्याद दिली आहे. त्यानुसार दिपनकर माजी, सोमीन बेरा ऊर्फ कार्तिक, सोमनाथ सामंता, आन्मेश दुलोई, सत्तु बेरा, स्नेहा बेरा (पूर्ण नाव व पत्ता उपलब्ध नाही) असे गुन्हा दाखल झालेल्या कारागिरांची नावे आहेत. देडगावकर बंधूंचे ‘देडगावकर ज्वेलर्स’ नावाचे दुकान सराफ बाजारात असून, त्यांच्या तळमजल्यावर हे कारागीर दागिने बनवण्याचे काम करत होते. तसेच दोन कारागीर सोमनाथ सामंता आणि आन्मेश दुलोई हे शेजारील सोनार विजय जगदाळे यांच्या दुकानात कार्यरत होते. २६ ऑक्टोबर रोजी सायंकाळी साडेसातच्या सुमारास फिर्यादी कृष्णा देडगावकर तळमजल्यावर गेले असता, कारागीर दिपनकर माजी गायब असल्याचे दिसून आले. संपर्क करण्याचा प्रयत्न केला असता त्याने दहा मिनिटांत येतो असे सांगितले, मात्र त्यानंतर त्याचा मोबाईल बंद झाला. त्याचवेळी इतर कारागीरांचे मोबाईलही बंद लागल्याने संशय अधिक गडद झाला.पुढील चौकशीत हे सर्व कारागीर आपल्या निवासस्थानी नसल्याचे, घरे कुलूपबंद असल्याचे आढळले. अखेर खात्री पटली की त्यांनी दागिने करण्यासाठी विश्वासाने दिलेले सोने घेऊन पलायन केले आहे.

या प्रकरणात एकूण २ किलो २१ ग्रॅम सोने व दागिने चोरीस गेले असून, त्याची किंमत तब्बल १ कोटी १ लाख ५ हजार रुपये इतकी आहे. चोरी गेलेल्या सोन्यात कृष्णा देडगावकर यांचे २७ लाख ७५ हजार, प्रतीक देडगावकर यांचे १३ लाख, विजय जगदाळे यांचे ३२ लाख ५० हजार, सागर गुरव यांचे ४ लाख ६५ हजार, भरत दगडूशेठ शिराळकर यांचे ८५ हजार, बरजहान सुलेमान शेख यांचे ७ लाख, प्रमोद गाडगे यांचे १४ लाख २५ हजार आणि इम्रान अली यांचे १ लाख ५ हजार रुपये किंमतीच्या सोन्याचा समावेश आहे. सदर कारागीरांनी गेल्या काही महिन्यांत सोनारांचा विश्वास संपादन करून लबाडीने ही चोरी केल्याची प्राथमिक माहिती मिळाली आहे. त्यांच्या पत्त्यांची स्पष्ट माहिती नसल्याने पोलिसांना तपासात अडचण येत आहे. या प्रकरणी ६ कारागिरांवर बीएनएस कलम ३१६ (२), ३(५) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# अहिल्यानगर महापालिकेचे आयुक्त यशवंत डांगे यांच्या ‘नियुक्ती चौकशी’चे आदेश

## नगर विकास विभागाकडून मागवला तात्काळ अहवाल

नगर – अहिल्यानगर महानगरपालिकेचे आयुक्त व प्रशासक यशवंत डांगे यांच्या नियुक्तीवर घेण्यात आलेल्या आक्षेपांकडे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अखत्यारीतील नगर विकास विभागाने चक्क दुर्लक्ष केले आहे. राज्य निवडणूक आयोगाने दोनवेळा याबाबतचा अहवाल पाठवण्याचे आदेश नगर विकास विभागाला दिले होते. पण या विभागाने त्यावर काहीच कार्यवाही केली नाही व एकप्रकारे निवडणूक आयोगाच्या आदेशाला केराची टोपली दाखवल्याचे दिसत आहे. या पार्श्वभूमीवर, राज्य निवडणूक आयोगाने आता पुन्हा तिसऱ्यांदा नगर विकास विभागाच्या कक्ष अधिकाऱ्यांना पत्र पाठवले असून, तातडीने आयुक्त डांगे यांच्या नियुक्तीवरील आक्षेपांची सविस्तर चौकशी करून नियमानुसार पुढील आवश्यक कार्यवाही करावी व अहवाल पाठवण्याचे आदेश दिले आहेत.

या आदेशावर नगर विकास विभाग आता काय कार्यवाही करते, हे पाहणे उत्सुकतेचे झाले आहे. नगरमधील शाकीर शेख यांनी आयुक्त डांगे यांच्या नियुक्तीवर आक्षेप घेतला आहे. पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील व नगरचे आमदार संग्राम जगताप यांच्या शिफारशीमुळे डांगे यांची नगर मनपात नियुक्ती झाली असून, ते मनपा कामकाजात पक्षपातीपणा करतात, असा दावा या आक्षेपात शेख यांनी केला आहे.

शेख यांनी आयुक्त डांगे यांच्या नगर मनपातील नियुक्तीला २४ मे २०२५ रोजी आक्षेप घेतला होता. त्यावर राज्य निवडणूक आयोगाने ४ जून २०२५ रोजी नगर विकास विभागाला पत्र पाठवून डांगेंच्या नियुक्तीवर घेण्यात आलेल्या आक्षेपांची चौकशी करून व नियमानुसार कार्यवाही करून अहवाल देण्याचे आदेश दिले होते. पण त्यावर नगर विकास विभागाने काहीच कार्यवाही केली नसल्याने निवडणूक आयोगाने पुन्हा १० ऑक्टोबरला नगर विकास विभागाला दुसरे पत्र पाठवून कार्यवाहीच्या सूचना केल्या होत्या. मात्र, त्याकडेही दुर्लक्ष करण्यात आले. या पार्श्वभूमीवर, शेख यांनी निवडणूक आयोगाकडे पुन्हा १६ ऑक्टोबरला तक्रार करून आयुक्त डांगे यांच्यावर नगर विकास विभागाने काहीच कार्यवाही केली नसल्याने त्यांनी नगर मनपाची प्रभाग रचना करताना पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील व आ. संग्राम जगताप यांच्या दबावाला बळी पडून विरोधक उमेदवारांच्या प्रभागांची मोडतोड केल्याचा दावा केला व डांगे हे पक्षपातीपणे काम करतात, असेही म्हणणे मांडले.

निवडणूक आयोगाने त्यांच्या या तक्रारीची तातडीने दखल घेतली व नगर विकास विभागाला तिसरे पत्र पाठवून तातडीने या प्रकरणाची सविस्तर चौकशी करून आणि नियमानुसार आवश्यक पुढील कार्यवाही करून अहवाल देण्याचे आदेश दिले आहेत. राज्य निवडणूक आयोगाच्या तहसीलदार संगीता वराडे यांनी नगर विकास विभागाच्या कक्ष अधिकाऱ्यांना २७ ऑक्टोबर रोजी हे पत्र पाठवले आहे. आता या पत्रावर नगर विकास विभागाद्वारे काय कार्यवाही होते व राज्य निवडणूक आयोगाला काय अहवाल पाठवला जातो, याची उत्सुकता वाढली आहे.

# परप्रांतीय कामगारांच्या पोलिस व्हेरिफिकेशनसाठी स्वतंत्र आणि संघटित यंत्रणा स्थापन करून विशेष मोहीम राबवावी

## सराफ सुवर्णकार व्यापारी संघटनेची मागणी

नगर – महाराष्ट्रभर ज्वेलरी उद्योगात काम करणारे बंगाली व इतर परप्रांतीय कामगार हे अत्यंत संवेदनशील व विश्वासाच्या क्षेत्रात कार्यरत आहेत. त्यामुळे त्यांच्या पोलीस व्हेरिफिकेशनची स्वतंत्र व संगठित यंत्रणा स्थापन करणे आता अपरिहार्य झाले आहे, त्यामुळे यासाठी तातडीने विशेष मोहीम राबवावी, अशी मागणी सराफ सुवर्णकार व्यापारी संघटनेच्यावतीने अध्यक्ष प्रकाश लोळगे यांनी पोलिस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

निवेदनात म्हटले आहे की, ज्वेलरी व्यवसायात कार्यरत सर्व परप्रांतीय कामगारांचे पोलीस व्हेरिफिकेशन करण्यासाठी विशेष मोहीम राबवावी, सर्व दागिने व्यापाऱ्यांना व्हेरिफिकेशन प्रमाणपत्राशिवाय कोणालाही कामावर न घेण्याचे निर्देश जारी करावेत, सहा कारागिर दोन किलो सोने घेवून पसार झाल्याच्या घटनेबाबत दाखल गुन्ह्याच्या तपासाच्या संदर्भात विशेष तपास पथक (Special Investigation Cell) गठित करून, पळून गेलेल्या आरोपींना जेरबंद करण्यासाठी राज्य स्तरावर समन्वय यंत्रणा स्थापित करावी. सुवर्णकार व्यापारी समाज कायद्याचा पूर्ण आदर राखतो आणि पोलीस प्रशासनाला पूर्ण सहकार्य करेल. मात्र व्यापाऱ्यांच्या सुरक्षिततेसाठी व नागरिकांच्या विश्वासासाठी ही पावले तातडीने उचलणे अत्यावश्यक आहे. सदर गुन्ह्याचा तपास पो.नि. संभाजी गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे आणि त्यांनी संबंधित यंत्रणांना तातडीने निर्देश दिलेले आहेत. तपास पथक गुन्हेगारांच्या मागावर असून, आरोपी लवकरच जेरबंद होतील, असा आम्हाला विश्वास आहे, असेही या निवेदनात म्हटले आहे.

भावपूर्ण श्रद्धांजली
आठवणींचा स्मृतीगंध.. दरवळत राहील निरंतर..
स्व.सौ. ऐश्वर्या आकाश बोऱ्हाडे



दशक्रिया विधी
बुधवार दि. २९ ऑक्टोबर २०२५ रोजी, सकाळी ८.०० वा.
स्थळ : अमरधाम, नालेगाव, अहिल्यानगर
प्रवचन
ह.भ.प. प्रेममूर्ती राजेंद्र महाराज कडलग
(प्रथम पदवीधर कीर्तनकार, महाराष्ट्र राज्य)
दुःखांकित
समस्त बोऱ्हाडे परिवार
समर्थ मिडिया
लोळगे ज्वेलर्स

बाळ बाळंतिणीची तेल मालिश केली जाईल.
तसेच फक्त महिलांसाठी तेल मालिश केली जाईल.
(Home service)
85529 12576

varshaplastics.com
Varsha
Real Product. Real Value.
अटूट रिश्ता जिंदगी भर का
मजबूत व टिकाऊ
उत्पादनांची विश्वासार्ह श्रृंखला!



Unbreakable Household | Garden Pipes | Furniture
HDPE Pipes | Sprinklers | Cleaning Products
200+ PRODUCT RANGE
- AUTHORISED DISTRIBUTOR -
M/s. Abhay Sales Corporation & Hardware
In front of Sarvodaya Colony, beside Gajanan Hospital, Satbhai Mala, Delhi Gate, Ahilyanagar.
Office Mob. 9145008009/9822542011

पाहिजेत
अहिल्यानगरमधील नामांकित सुवर्णदालन चंदुकाका ज्वेल्स्, सावेडी येथील शोरूमसाठी हवे आहेत.
कॅशियर
जागा : 4 (पुरुष)
कामाची वेळ : सकाळी 10 ते रात्री 9 पर्यंत
कुठल्याही क्षेत्रातील अनुभवींना प्राधान्य.
पगार : 17000/- ते 18000/-
पेक्षाही जास्त मिळवा + पीएफची सुविधा
मोड कारागीर
जागा : 4 (पुरुष)
कामाची वेळ : सकाळी 10 ते रात्री 9 पर्यंत
सराफी क्षेत्रातील अनुभवींना प्राधान्य.
पगार : 17000/- ते 18000/-
पेक्षाही जास्त मिळवा + पीएफची सुविधा
इच्छुक उमेदवारांनी सविस्तर अर्ज बायोडाटासह मंगळवार ते शनिवार सकाळी 11 ते 2 यावेळेत समक्ष भेटावे.
चंदुकाका ज्वेल्स
सोनेरी नातं..
शॉप नंबर 2/3, साई मिडास टच, नगर-मनमाड रोड, सावेडी, अहिल्यानगर
9272422001/02
बुधवार चालू

FOR - B.COM, M.COM, BBA, BBCA, MBA STUDENT
COURSE DETAILS
100% JOB ASSISTANCE
DiSHA® An ISO 9001:2015 Certified COMPUTER INSTITUTE
CERTIFICATE COURSE IN ADVANCE ACCOUNTING
COMPUTER APPLICATION | TAXATION, BANKING | ADVANCE ACCOUNTING | AUDITING
Experience Faculties | 1 Lac + Students Trained | Job Assistance
IN JUST 17900/-
Delhi Gate Branch: 1st Floor, 204, Anand Keshav Heights, Above Supekar Medical, Delhi Gate, Ahmednagar-414001. 9371051769
Old ST stand Branch: Office No.140, 1st Floor, Amber Plaza, Near Lokmanthan Office, Near Maliwada Stand, Station Road, Ahmednagar-414001. 9371151769
Pipeline Branch: Office No. 202, Second Floor, Rucha Garden, Bhistbag Chowk, Pipeline Road, Ahmednagar, 414003. 7447761769

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
नवा मराठा
फोन-२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

## व्यापाऱ्याला खंडणी मागत जीवे मारण्याची धमकी; महिलेसह तिघांविरुद्ध गुन्हा दाखल

नगर - किराणा व्यापाऱ्याला १ लाख ७० हजारांची खंडणीची मागणी करत रात्रीच्या वेळी दुकान फोडू, खोटे गुन्हे दाखल करू तसेच तुझ्यासह कुटुंबियांना जीवे ठार मारू अशी धमकी देण्यात आल्याची घटना नगर तालुक्यातील कामरगाव येथे २७ ऑक्टोबर रोजी दुपारी ३ च्या सुमारास घडली.

याबाबत चेतन विजय गुगळे (वय ३७, रा. कामरगाव, ता.नगर) यांनी नगर तालुका पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादी यांचे गावात किराणा दुकान आहे. २७ ऑक्टोबर रोजी दुपारी ३ च्या सुमारास त्यांच्या दुकानात तुषार सावत्या भोसले, सावत्या अकल्या भोसले, प्रीती तुषार भोसले (सर्व रा. पिंपळगाव कौडा, ता. नगर) हे आले आणि फिर्यादी यांना उधार किराणा माल मागू लागले. त्यावेळी फिर्यादी यांनी तुमच्या कडे २ वर्षापासून उधारी असून ती अगोदर द्या अशी मागणी केली. अगोदरची उधारी दिल्यावर तुम्हाला किराणा देतो असे ते म्हणाले.

त्यावेळी तुषार आणि सावत्या यांनी तुझी आमच्या कडे कुठलीच उधारी नाही, तूच आम्हाला १ लाख ७० हजार रुपये दे नाहीतर तुझ्यावर खोटी केस करू, रात्री तुझे दुकान फोडून तुला व तुझ्या कुटुंबाला उचलून नेवून मारून टाकू अशी धमकी दिली. तसेच प्रीती भोसले हिला यापूर्वी ही किराणा मालाची उधारी मागितली असता तिने पैशाची मागणी करत धमकी दिली असल्याचे गुगळे यांनी फिर्यादीत म्हंटले आहे.

या फिर्यादी वरून पोलिसांनी तिघांच्या विरुद्ध बीएनएस कलम ३०८ (२) (५), ३५२, ३५१ (२) (३) प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे.

# जैन समाजाच्या मंदिरांची जागा लाटणाऱ्यांच्या विरोधात स्वयंघोषित हिंदू धर्मरक्षक गप्प का ?

### नितेश राणे, गोपीचंद पडळकर, संग्राम भंडारे महाराज कोणत्या बिळात लपले आहेत? किरण काळेंचा सवाल

नगर - भाजप केंद्रीय मंत्र्यांन जैन समाजाच्या पुण्यातील मंदिराचा हजारो कोटींचा भूखंड लाटण्याचा प्रयत्न केला. देशभरात काल मोर्चे निघाले. अहिल्यानगर शहरात देखील निघाला. आम्ही त्यात सहभागी झालो. ठाकरे शिवसेनेने पाठिंबा देखील दिला. मात्र तथाकथित स्वयंघोषित बेगडी हिंदू धर्मरक्षक काल कोणत्या बिळात जाऊन लपले होते ? जैन समाजाच्या मंदिरांची जागा लाटणाऱ्यांच्या विरोधात तुम्ही मूग गिळून गप्प का ? असा सवाल ठाकरे शिवसेनेचे शहर प्रमुख किरण काळे यांनी केला आहे.

काळे म्हणाले, मुस्लिम, ख्रिश्चन समाजाने तुम्हाला मतदान केले नाही. म्हणून वैयक्तिक द्वेषातून तुम्ही सतत धार्मिक द्वेष पसरवता. भडकावू भाषण करून वातावरण दूषित करता. हिंदू, जैन मतदारांनी, व्यापाऱ्यांनी तुम्हाला मतं दिली नाहीत का ? अशी कोणती गोष्ट तुमच्या मनाला खात होती की ज्यामुळे तुमची मोर्चात सहभागी होण्याची हिंमत झाली नाही ? आता हिंदुत्व खतरे में नाही का ? तुमच्या सुरात सूर मिसळून नगरचं वातावरण दूषित करणारे तथाकथित हिंदुत्ववादी नेते म्हणवणारे टिल्लू नितेश राणे, गोपीचंद पडळकर, संग्राम भंडारे महाराज आता कोणत्या बिळात लपले आहेत ?, असा सवाल काळे यांनी केला आहे.

काळे पुढे म्हणाले, अफजलखानाने त्यावेळी तुळजापूरच्या तुळजाभवानी मातेच्या मंदिरात धुडगूस घातला होता. नंतर प्रतापगडाच्या पायथ्याशी तुळजापूरच्या मंदिराशी बुऱ्हानगरच्या देवीची कमान सत्ताधारी पक्षाच्या आम जमिनीधोस्त केली होती.




शिवाजी महाराजांनी त्याचा वध केला. हिंदूंच्या त्याच निगडित असणाऱ्या बुलडोझर लावून एका दाराने काही दिवसांपूर्वी देवीच्या पालखीची मोडतोड केली होती. हिंदूंच्या मंदिरांवर घाला घातला जात असताना तुम्ही गप्प का होते ? तुम्हाला हिंदुत्वाचे काही देणे घेणे नाही हेच खरे आहे. राजकारणाचे निव्वळ व्यापारीकरण तुम्ही केले आहे. तथाकथित हिंदुत्वाच्या नावाखाली समाजाला वेड्यात काढणाऱ्या राजकीय पुढाऱ्यांपासून अंधभक्तांनी सावध राहावे.

#### शिक्षण संस्था, मंदिरांच्या जागा लाटण्याचा यांचा धंदा

स्वयंघोषित हिंदू धर्मरक्षकांनी अनेक वर्षांपूर्वी या शहरातील हिंदूंच्या असणाऱ्या एका नामांकित वैद्यकीय महाविद्यालयाची मोक्याच्या ठिकाणी असणारी कोट्यावधी रुपयांची जागा लाटली. त्या ठिकाणी आपला राजकीय अड्डा बनवला. कार्यालय थाटलं. हिंदूंच्याच असणाऱ्या शतकोत्तर उज्वल शैक्षणिक परंपरा असणाऱ्या एका नामांकित शिक्षण संस्थेच्या पत्रकार चौका जवळील महामार्गा लगत असणाऱ्या शेकडो कोटींची जागा लाटण्यासाठी सत्तेचा गैरवापर केला. त्या प्रकरणात एका लोकप्रतिनिधीच्या स्वतःच्या सहीच्या लेखी पत्राचा त्यावेळी मी भांडाफोड केला. शहरातील युवकांच्या शिक्षण, रोजगारावर घाला घालून आजही हा लुटीचा डाव सुरूच आहे.

#### हिंदूंना तुम्ही फतवे काढता, तुमचे काय?

हिंदूंनी केवळ हिंदूंकडूनच खरेदी करावी असा फतवा तुम्ही काढता. पण त्या शिक्षण संस्थेच्या ताब्यात असणारी जागा, की जी मूळ एका मुस्लिम ट्रस्टची आहे, ती तुम्हाला चालते. नगर कॉलेज जवळ एका हॉटेलची जागा तुम्ही एका मुस्लिम व्यक्तीकडनं खरेदी करता ते चालते. स्वतःचं हॉटेल, परमिट रूम, बिअर शॉपी, हॉस्पिटल या ठिकाणी केवळ हिंदूंनाच सेवा मिळेल, असा कोणताही फलक तुम्ही लावत नाही. तुम्हाला अन्य धर्मीय ग्राहक पैसे कमवण्यासाठी चालतात. पण इतरांवर तुम्ही नको ते फतवे लादता. हिंदूंना तुम्ही फतवे काढता, तुमचे काय ?. असा सवाल करत काळे म्हणाले, खरं तर नगरकरांनी यातून बोध घ्यावा. शहर रसातळाला नेणाऱ्यांचे भविष्यात योग्य वेळी काय केले पाहिजे हे ठरवण्यासाठी नगरकर सुज्ञ आहेत असे काळे म्हणाले.

# शासनाने तातडीने सोयाबीन हमीभाव केंद्र सुरू करावेत किंवा हमीभावापेक्षा कमी भावात विकलेल्याचा फरक शेतकऱ्यांना द्यावा

नगर - शासनाने तातडीने सोयाबीन हमीभाव केंद्र सुरू करावेत किंवा हमीभावापेक्षा कमी भावात विकलेल्या सोयाबीनचा फरक शेतकऱ्यांना द्यावा अशी मागणी भारतीय जनसंसदचे राज्य अध्यक्ष अशोक सब्बन तथा जिल्हाध्यक्ष सुधीर भद्रे यांनी केली आहे.

यावर्षी ९ मे पासूनच पावसाला सुरुवात झाल्यामुळे खरीप पिकासाठी शेतकऱ्यांना पाणी आणि ओली ची अजिबात कमतरता पडली नाही. वेळेआधी झालेल्या पावसामुळे रब्बी कांद्याचे नुकसान झाले असले तरी सोयाबीनची पेरणी वेळे आधीच झाली. पिकांची वाढ ही अतिशय उत्तम प्रकारची दिसून आली. मात्र काढणीदरम्यान झालेल्या अतिवृष्टीमुळे सोयाबीन पिकाचे नुकसान झालेले आहे. काही शेतकऱ्यांच्या सोयाबीनच्या पिकामध्ये अद्यापही पाणी असल्यामुळे पीक काढता आलेले नाही. ज्या शेतकऱ्यांनी सोयाबीन काढणी केली आहे त्यांना त्यांच्या घरामध्ये अपुऱ्या जागेमुळे सोयाबीन ठेवता येत नाही आणि पाऊसही बंद होण्याचे नाव अद्यापही घेत नाही. विक्रीसाठी सोयाबीन न्यावे तर त्याला ४१ रुपयांच्या दरम्यान बाजार भाव सध्या मिळतो आहे. शासनाने सोयाबीन साठी ५३.२८ रुपये हमी भाव जाहीर केलेला आहे. सुमारे १२ ते १३ रुपयांचा तोटा प्रति किलो मागे शेतकऱ्यांचा होतो आहे. आधीच सोयाबीनचा यावर्षीचा उत्पादन खर्च खूपच मोठ्या प्रमाणावर वाढलेला आहे.

शासनाने तातडीने सोयाबीन हमीभाव केंद्र सुरू केले तरी सोयाबीन नोंदणी करणे, शेतकऱ्यांचा खरेदी केंद्रावर सोयाबीन विकण्यासाठी नंबर येणे या बाबीला बराच वेळ लागणार आहे. ही बाब शेतकऱ्यांच्या लक्षात असल्यामुळे शेतकरी हमीभाव केंद्रा ऐवजी व्यापाऱ्यांना कमी भावात सोयाबीन विक्री करतात.

याकरिता एकतर शासनाने तातडीने हमीभाव केंद्र सुरू करावेत अथवा शेतकऱ्यांना विकलेल्या सोयाबीनच्या भावाची आणि हमीभावाची फरक रक्कम द्यावी, अशी मागणी भारतीय जनसंसदचे राज्य अध्यक्ष अशोक सब्बन, तालुका अध्यक्ष पोपटराव साठे, शहर अध्यक्ष रईस शेख, कर्जत तालुका अध्यक्ष शब्बीरभाई पठाण, जामखेड तालुका अध्यक्ष शेख फकीर मोहम्मद, श्रीगोंदा तालुका अध्यक्ष विलास वाघमारे, पारनेर तालुका अध्यक्ष भाऊ गांधी, राहुरी तालुका अध्यक्ष कुमार डावखर, नेवासा तालुका अध्यक्ष रामराव पाटील भदगले, कोपरगाव तालुका अध्यक्ष शंकरराव फटांगरे, वीर बहादुर प्रजापती, सुनील टाक व जिल्हाध्यक्ष सुधीर भद्रे यांनी शासनाकडे केली आहे.

## माणिकनगर येथून मोटारसायकलची चोरी

नगर - शहरातील माणिकनगर येथे अनमोल फिनवेस्ट, चंदन इस्टेट समोर उभी केलेली हिरो कंपनीची स्प्लेंडर प्लस मोटारसायकल (क्र. एम एच ४५ ए बी ४९४२) अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना २७ ऑक्टोबर रोजी सकाळी १०.३० ते दुपारी ४ या कालावधीत घडली.

याबाबत प्रद्युम्न राधाकिसन जगताप (वय २१, रा जकात नाक्याजवळ, जामखेड रोड) याने कोतवाली पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. या फिर्यादीवरून पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध बीएनएस कलम ३०५ (ब) प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे.

## शासकीय कार्यालयात अडवणूक होत असेल तर कायदेशीर कारवाईसाठी नागरिकांनी पुढे येण्याचे आवाहन

नगर - शासकीय कार्यालयात नागरीकांची प्रकरणे विनाकारण प्रलंबीत असतील, नागरिकांची अडवणूक होत असेल तर तात्काळ दप्तर दिरंगाई कायदा-२००६ अन्वये तसेच भारतीय न्याय संहिता कलम १९८, १९९ अन्वये कायदेशीर कारवाई करण्यासाठी पुढे यावे असे आवाहन महाराष्ट्र राज्यातील शेतकरी, कामगार, व्यापारी, उद्योजक, विद्यार्थी, शासकीय सेवक, पेन्शनर्स, जेष्ठ नागरीक, समाजसेवक/सामाजीक कार्यकर्ते यांना करण्यात आले आहे.

या कायद्या विषयी जनजागृती करताना नगर मधील अरूण बांगर यांनी म्हंटले आहे की, शासकीय कार्यालयात नागरीकांची प्रकरणे विनाकारण प्रलंबीत असेल, शासकीय अधिकारी/कर्मचारी यांचेकडून नागरीकांची अडवणूक होऊन नागरीकांची प्रकरणी कामे होत नसतील तर अशा संबंधीत कसुरदार शासकीय अधिकारी / कर्मचारी यांचे विरूध्द दप्तर दिरंगाई कायदा-२००६ अन्वये तसेच भारतीय न्याय संहिता कलम १९८, १९९ अन्वये कायदेशीर कारवाई करण्यासाठी नागरिकांनी या सामाजीक कार्यात एकजुटीने सहभाग घेणे आवश्यक आहे. यामुळे शासकीय कार्यालयातील नागरीकांचे प्रलंबीत प्रकरणाची तात्काळ निर्गती होऊन प्रशासकीय दृष्टीकोनातून महाराष्ट्र शासनाची झिरो पेंडन्सी ही संकल्पना यशस्वी होऊन प्रभावीपणे अमंलबजावणी होईल. जनशक्ती, जनजागृतीमुळे हे शक्य आहे.

याबाबत ज्या नागरीकांची प्रकरणे शासकीय कार्यालयात ७ दिवसांपेक्षा अधिक कालावधी होऊन देखील विनाकारण प्रलंबीत असतील, शासकीय अधिकारी/कर्मचारी यांचेकडून नागरीकांची अडवणूक होत असेल, अशा नागरीकांनी संबंधीत कसूरदार शासकीय अधिकारी/कर्मचारी यांचे विरूध्द दप्तर दिरंगाई कायदा-२००६अन्वये कायदेशीर कार्यवाही करणेसाठी संबंधीत कसुरदार शासकीय अधिकारी/कर्मचारी यांचे सक्षम अधिकारी यांचेकडे तक्रारी अर्ज प्रकरणाचे कागदपत्रासह दाखल करण्याची तात्काळ कार्यवाही करावी. त्याचप्रमाणे नागरीकांनी संबंधीत कसुरदार शासकीय अधिकारी/कर्मचारी यांचे विरूध्द संबंधीत पोलीस स्टेशनला /न्यायालयात भारतीय न्याय संहिता कलम १९८, १९९ अन्वये फिर्याद देऊन गुन्हे दाखल करण्याची तात्काळ कायदेशीर कार्यवाही करावी असे आवाहनही अरूण बांगर यांनी केले आहे.

# नव्या कचरा गाड्यांच्या माध्यमातून मनपाकडून नगरकरांची 'दिशाभूल' आणि 'मोठी फसवणूक'

### माजी नगरसेवक योगीराज गाडे यांचा आरोप; आयुक्तांवर गुन्हा दाखल करण्याची मागणी

नगर - महापालिकेच्या वतीने शहरात कचरा संकलनासाठी ८० घंटा गाड्या खरेदी केल्याचा डांगोरा पिटवला जात असून या कचरा गाड्यांवर ओला कचरा आणि सुका कचरा असे लिहिलेले आहे. मात्र प्रत्यक्षात या गाडी मध्ये कुठलेही वेगवेगळे कप्पे नाहीत. त्यामुळे महापालिका प्रशासन आणि आयुक्त जनतेची दिशाभूल करत असून, नव्या कचरा गाड्यांच्या माध्यमातून करदात्यांची लूट करत आहेत. ही एक मोठी फसवणूक असल्याचा आरोप माजी नगरसेवक योगीराज गाडे यांनी केला आहे. तसेच याबाबत आयुक्त यशवंत डांगे यांच्यावर गुन्हा दाखल करण्याची मागणीही त्यांनी केली आहे.



महापालिकेच्या कचरा गाड्यांची पाहणी करताना माजी नगरसेवक योगीराज गाडे व सहकारी.

याबाबत बोलताना गाडे म्हणाले, अलीकडेच आहिल्यानगर महानगरपालिका व आयुक्त यशवंत डांगे यांनी मोठ्या धुमधडाक्यात शहरासाठी ८० नवीन कचरा संकलन गाड्यांचे उद्घाटन केले. माध्यमांमधून व अधिकृत निवेदनांमधून आयुक्तांनी शहरातील कचऱ्याचा प्रश्न आता संपला असल्याचे जाहीर केले. परंतु वास्तव मात्र याच्या नेमक्या उलट आहे.

महानगरपालिकेच्या खर्चातून नव्हे, तर जनतेच्या कराच्या पैशातून या सर्व कचरा गाड्या विकत घेतल्या गेल्या आहेत. नागरिकांनी प्रामाणिकपणे भरलेले कर, हाच या कचरा संकलन योजनेचा पाया आहे. महानगरपालिकेचे अधिकारी, कर्मचारी आणि अगदी आयुक्त यांचे वेतनसुद्धा ह्याच करदात्यांच्या पैशांतून जाते हे विसरून चालणार नाही.

आपण सहकाऱ्यांसोबत या नव्या कचरा गाड्यांची प्रत्यक्ष पाहणी केली. या पाहणीदरम्यान एक अत्यंत गंभीर बाब आमच्या निदर्शनास आली.या गाड्यांवरील निळे आणि हिरवे रंग नागरिकांना भ्रमित करण्यासाठी लावण्यात आले आहेत. बाहेरून पाहता, एक बाजू ओल्या कचऱ्यासाठी आणि दुसरी बाजू सुका कचरा यासाठी असल्याचे दाखवले जाते. पण प्रत्यक्षात, गाडीच्या आत एकही स्वतंत्र कप्पा नाही. ओला आणि सुका कचरा दोन्ही एकाच ठिकाणी एकत्र टाकला जात आहे.

यामुळे, नागरिकांची फसवणूक होत असून, हा प्रकार म्हणजे महानगरपालिका आणि आयुक्तांकडून जनतेची दिशाभूल व करदात्यांच्या पैशांचा अपव्यय आहे. काही गाड्यांची स्थिती तर सुरू होण्यापूर्वीच दयनीय आहे. सायरन, ध्वनी व्यवस्था व इतर आवश्यक सुविधा उपलब्धच नाहीत.

आहिल्यानगर महानगरपालिकेने या ८० गाड्यांना शहर स्वच्छतेचे समाधान म्हणून दाखवले आहे, परंतु प्रत्यक्षात शहराला स्वच्छ करण्यासाठी किमान १३० पेक्षा अधिक गाड्यांची आवश्यकता आहे. केवळ उद्घाटनाचे फोटोसेशन आणि प्रसिद्धी हेच उद्दिष्ट दिसते.

हा प्रकार म्हणजे जनतेचा विश्वासघात आणि करदात्यांच्या पैशांची उघड लूट आहे. त्यामुळे आयुक्त यशवंत डांगे आणि महानगरपालिका प्रशासनावर गुन्हा दाखल करण्याची गरज आहे. नागरिकांनी अशा दिखाऊ योजना आणि फसव्या आश्वासनांपासून सावध राहावे.खऱ्या अर्थाने स्वच्छ, जबाबदार आणि पारदर्शक प्रशासनाची मागणी आता प्रत्येक नागरिकाने करणे अत्यावश्यक आहे. असेही योगीराज गाडे म्हणाले.

## शांताबाई भंडारी यांचे अल्प आजाराने निधन

नगर - आनंदनगर स्टेशन रोड येथील शांताबाई चांदमल



भंडारी (देवीभोयरेवाला, वय ७७) यांचे २८ ऑक्टोबर रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्यावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे पती, २ मुले, २ मुली, सुना, नातवंडे, जावई असा परिवार आहे. चांदमल लोढा यांच्या त्या पत्नी तर संजय व मनोज भंडारी यांच्या मातोश्री होत.

## रुक्मिणीबाई सुर्यवंशी यांचे हृदयविकाराने निधन

नगर - वंजारगल्ली येथील रहिवासी रुक्मिणीबाई आसाराम



सुर्यवंशी (ताई) (वय ८०) यांचे २७ ऑक्टोबर रोजी हृदयविकाराने निधन झाले. त्यांच्यावर २८ ऑक्टोबर रोजी नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे १ मुलगा, ५ मुली, सुन, जावई, नातवंडे असा परिवार आहे. पवननगर येथील अंबिका दूध डेअरीचे संचालक रोहित सुर्यवंशी यांच्या त्या मातोश्री होत.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

# स्व.आ.शिवाजीराव कर्डीले यांना श्रध्दांजली अर्पण करण्यासाठी ३० ऑक्टोबरला सर्वपक्षीय शोकसभा

नगर - भाजपाचे स्व.आ. शिवाजीराव कर्डीले यांना श्रध्दांजली अर्पण करण्यासाठी सर्वपक्षिय शोकसभेचे आयोजन ३० ऑक्टोंबर रोजी करण्यात आले असल्याची माहीती पद्मश्री डॉ.विठ्ठलराव विखे पाटील सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन डॉ.सुजय विखे पाटील यांनी दिली.



अहिल्यानगर जिल्हा बॅकेंच्या सहकार सभागृहात सकाळी १०.३० वाजता ही शोकसभा होईल. स्व. कर्डीले यांच्या निधनाने भारतीय जनता पक्ष तसेच संपूर्ण अहिल्यानगर जिल्ह्याला मोठा धक्का बसला. त्यांच्या निधनाने दुखांकिंत झालेल्या सर्वच पक्षांमधील त्यांच्या स्नेहीजनांना त्यांच्या विषयी असलेल्या भावना व्यक्त करायच्या आहेत. यासाठी या शोकसभेचे आयोजन करण्यात आले असल्याचे डॉ. विखे म्हणाले.

स्व. कर्डीले यांनी आपल्या संपूर्ण राजकीय, सामाजिक वाटचालीत समाजातील शेवटच्या घटकापर्यंत संपर्क कायम ठेवला होता. राहुरी- नगर विधानसभा मतदार संघाच्या विकासात्मक वाटचालीत त्यांचे योगदानही मोठे राहीले. जिल्हा सहकारी बँकेंच्या माध्यमातून शेतकरी सभासदांच्या हिताचे निर्णय करुन, बँकेला लोकाभिमुख चेहरा मिळवून देण्यासाठी त्यांच्या केलेल्या प्रयत्नांची आठवण स्मरणात राहणारी आहे.

# राखीव जागांवर निवडून आलेल्या उमेदवारांना जात वैधता प्रमाणपत्रासाठी ६ महिने मुदतवाढ

### राज्य मंत्री मंडळाच्या बैठकीत निर्णय

मुंबई - स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत राखीव जागांवर निवडून आल्यानंतर उमेदवारांना जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यासाठी सहा महिन्यांची मुदतवाढ देण्याचा निर्णय २८ ऑक्टोबर रोजी मंत्रिमंडळाने घेतला आहे. त्याचबरोबर राज्याच्या विकासाला दिशा देणाऱ्या 'विकसित महाराष्ट्र-२०४७' व्हिजन डॉक्युमेंटला मंत्रिमंडळाने मंजुरी दिली.

नगरविकास विभाग आणि ग्रामविकास विभागाने घेतलेल्या निर्णयानुसार, महापालिका, नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरींसाठी तसेच ग्रामपंचायत, जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या सार्वत्रिक किंवा पोट निवडणुकीत राखीव जागांवर निवडून येणाऱ्या उमेदवारांना जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यासाठी सहा महिन्यांची मुदतवाढ मिळणार आहे. यासाठी मुंबई महानगरपालिका अधिनियम १८८८, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९, आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती आणि औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ मध्ये सुधारणा करण्यास मंजुरी देण्यात आली आहे. तर ग्रामविकास विभागासाठी महाराष्ट्र जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यास मुदत देणे, अध्यादेश २०२५ काढण्यास मान्यता देण्यात आली आहे.

विकसित महाराष्ट्र २०४७ च्या अंमलबजावणीसाठी मुख्यमंत्र्यांच्या नेतृत्वाखाली विकसित महाराष्ट्र व्हिजन मॅनेजमेंट युनिट (व्हीएमयू) गठीत करण्यात येणार आहे. राज्यातील नागरिकांकडून मते व प्रतिसाद मागवून, त्यांचे एआय-आधारित विश्लेषण करून डॉक्युमेंट तयार करण्यात आले आहे. या डॉक्युमेंटमध्ये राज्य व जिल्हा पातळीवरील १६ संकल्पना निश्चित करण्यात आल्या आहेत. प्रगतीशील, शाश्वत, सर्वसमावेशक आणि सुशासन या अंतर्गत १०० उपक्रम निश्चित करण्यात आले आहेत.

या शिवाय गृह विभागाने सोलापूर-तुळजापूर-उस्मानाबाद या नवीन ब्रॉडगेज रेल्वे मार्गाच्या सुधारित खर्चास आणि राज्य शासनाच्या ५० टक्के हिश्श्यानुसार अधिकचा निधी देण्यास मंत्रिमंडळाने मान्यता दिली. त्यामुळे या महत्त्वाकांक्षी रेल्वे मार्गाच्या कामाला गती मिळणार आहे.

# गृहिणी

## आरोग्य

### डोकेदुखीपासून मिळवा आराम

आजकालचे धावपळीचे जीवन, स्क्रीनवर वाढता वेळ, झोपेचा अभाव आणि वाढता ताण, या सर्व गोष्टी डोकेदुखीची समस्या सामान्य करत आहेत. बऱ्याचदा लोक तात्काळ आराम मिळवण्यासाठी वेदनाशामक औषधांचा अवलंब करतात, परंतु वारंवार औषध घेतल्याने शरीरावर नकारात्मक परिणाम होऊ शकतो. जर तुम्ही डोकेदुखीपासून आराम मिळवण्यासाठी नैसर्गिक, निरोगी आणि दुष्परिणाममुक्त मार्ग शोधत असाल तर आले हे एक नैसर्गिक दाहक-विरोधी औषध आहे. डोकेदुखी, मायग्रेन आणि मळमळ कमी करण्यासाठी ते प्रभावी आहे. पाण्यात आले उकळा आणि त्यात थोडे लिंबू आणि मध घालून प्या. ही चहा केवळ डोकेदुखी कमी करत नाही तर पचन सुधारते. तसेच पुदिन्यामध्ये मेन्थॉल असते जे नसा शांत करते आणि डोकेदुखीमध्ये त्वरित आराम देते. लिंबूमध्ये व्हिटॅमिन सी असते जे डिहायड्रेशन आणि थकवा दूर करते. पुदिन्याची पाने, लिंबाचा रस आणि थोडे मध मिसळून थंड पाणी पिल्याने डोकेदुखी लवकर कमी होते. डिहायड्रेशन हे डोकेदुखीचे एक प्रमुख कारण आहे. नारळाचे पाणी इलेक्ट्रोलाइट्सने समृद्ध असते आणि शरीराला त्वरित हायड्रेट करते. उष्णता किंवा थकव्यामुळे होणाऱ्या डोकेदुखीवर ते खूप प्रभावी आहे. जर डोकेदुखी तणावामुळे किंवा झोपेच्या कमतरतेमुळे होत असेल तर कॅमोमाइल चहा हा सर्वोत्तम पर्याय आहे. ही हर्बल चहा स्नायूंना आराम देते आणि तणाव कमी करते. रात्री झोपण्यापूर्वी ते प्यायल्याने चांगली झोप येण्यास देखील मदत होते.

## पाककला

### ब्रोकोली भुर्जी

**साहित्य :** १ वाटी ब्रोकोली, १ बारिक चिरलेला कांदा, लाल तिखट आवडी नुसार, १/४ चमचा धणे जीरे पूड, हळद, चवीनुसार मीठ, १/४ चमचा जीरे मोहरी, १ चमचा तेल

**कृती :** गॅसवर कढईमध्ये तेल टाकून जिरे, मोहरी, हिरवी मिरची, बारिक चिरलेला कढीपत्ता याची फोडणी करुन कांदा परतून घ्या. लाल तिखट, हळद, धणे, जिरेपूड घालून सर्व मिक्स करुन हलवून घ्या. आता छान स्वच्छ साफ केलेला ब्रोकोली वरुन घालून एकदा हलवून घ्या व चवीनुसार मीठ घाला आणि झाकण ठेऊन द्या. मधेमधे झाकण खोलून हलवून घ्या. जेणेकरून ब्रोकोली कढईला खाली चिकटणार नाही. भाकरी व पोळीबरोबर छान लागते.

## सल्ला

❊ बिस्किटे आणि कुकीज नेहमी हवाबंद कंटेनरमध्ये ठेवा. यामुळे हवा आणि ओलावा आत जात नाही आणि बिस्किटे बराच काळ ताजे आणि कुरकुरीत राहतात.

❊ कंटेनरमध्ये तांदूळ किंवा मीठ ठेवा तुम्ही कंटेनरमध्ये एका लहान भांड्यात तांदूळ किंवा थोडे मीठ देखील ठेवू शकता. हे ओलावा शोषून घेतात आणि बिस्किटे लवकर मऊ किंवा खराब होण्यापासून रोखतात.

## वास्तू

घरासमोरुन जर टी आकाराचा रस्ता जात असेल तर येथे राहणारे सर्व सदस्य मानसिकदृष्ट्या अस्वस्थ राहतात.

## सौंदर्य

चेहऱ्यावर ४ ते ५ मिनिटे तुरटी लावा आणि नंतर चेहरा धुवा. तुम्ही आठवड्यातून २ ते ३ वेळा ते वापरू शकता. यामुळे तुमचा रंग उजळू लागतो.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

## दैनिक पंचांग

बुधवार, दि. २९ ऑक्टोबर २०२५

**---, शके १९४७ विश्वावसुनामसंवत्सर, कार्तिक शुक्लपक्ष, उ.षा.१७|३०, सूर्योदय ०६ वा. ३२ मि. सूर्यास्त ०५ वा. ४० मि.**

### राशिभविष्य

**मेष :** ज्यांच्याबरोबर आपणास वेळ घालवणे आवडते त्यांना वेळ द्या. घरगुती बाबतीत अधीरता असेल. मागील उधारी वसुल होईल.

**वृषभ :** अनुकूल ते सहकार्य मिळेल. वेळेचे सदुपयोग केल्याने लाभ मिळेल. कौटुंबिक वेळ अनुकूल राहील. काळजीपूर्वक कार्य करा.

**मिथुन :** कामात व्यस्तता अधिक असल्यामुळे आरोग्यावर विपरीत प्रभाव पडू शकतो. आपल्या प्रिय व्यक्तींचा सहवास लाभेल.

**कर्क :** मैत्रिण किंवा प्रेयसी भेटेल. छोट्या-छोट्या अडचणी येतील. कुटुंबिय व मित्रांचा सहवास लाभेल. वरिष्ठांचे मार्गदर्शन लाभेल.

**सिंह :** प्रश्नांच्या सोडवणूकीसाठी आपल्या मित्रांचा व आपल्या कौटुंबिक सभासदांचा सहयोग घ्या.

**कन्या :** आरोग्य नरम-गरम राहील. नोकरदार मंडळीनो काळजीपूर्वक काम करा. वाहने व उपकरणे जपून चालवावीत.

**तूळ :** आपल्या व्यवहारांमध्ये सावधगिरी बाळगा. आजचा दिवस छान जाईल. आरोग्य उत्तम राहिल. मागील उधारी व उसनवारी मिळेल.

**वृश्चिक :** आपल्या कामांमध्ये मित्रांचा सहयोग मिळेल. शत्रूंपासून सावध राहा. व्यापार-व्यवसायात देवाण-घेवाण टाळा.

**धनु :** कोणतेही कार्य सहजरित्या होणार नाही. मुले त्रास देऊ शकतात. जुने सहकारी भेटल्यामुळे आठवणींना उजाळा मिळेल. आर्थिक व्यवहार जपून करा.


**मकर :** शत्रूंपासून सावध राहाल. व्यापार-व्यवसायात देवाण-घेवाण टाळाल. पितृचिंता सतावेल. गुरुजनांचे आशिर्वाद घ्यायला जाल.

**कुंभ :** यवहारांमध्ये सावधगिरी बाळगाल. कोणतेही कार्य सहजरित्या होणार नाही. जुने मित्र-मैत्रिणी भेटण्याची दाट शक्यता आहे.

**मीन :** शैक्षणिकवबौद्धिकक्षेत्रातीलव्यक्तींना दिवस चांगला जाईल. आर्थिक लाभाचे प्रमाण समाधानकारक राहील.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

## शब्दगंध क्र. ७२९० सौ.शैलजा कुलकर्णी



**आडवे शब्द :** १) आचार्य अत्रे यांचे एक गाजलेले विनोदी नाटक ६) दृष्टी ७) एक श्वासरोग ८) पायाने दिलेला रट्टा किंवा प्रहार ९) मोठा हातोडा १०) हत्ती; सळई; कांब ११) पंख; दुसरा १२) हाक १३) वृष्टी; वर्षाव १४) निष्णात; प्रवीण; कुशल १६) माणुसकी १८) इंग्लंडची राजधानी २०) अधर्म; पातक २१) गुणी; कुशल २२) थकवा; ग्लानी; शीण; मरगळ

**उभे शब्द :** १) गोंधळची अवस्था; मोगलांचे राज्य २) भारताच्या उत्तरेकडील एक देश ३) घराचा मधला भाग ४) शिजलेल्या डाळीचे केलेले एक पातळ कालवण ५) समुदाय; जमाव; सोसायटी ७) अतिकाम व त्यामुळे येणारा मानसिक व शारीरिक थकवा ११) दुसऱ्यावर अवलंबून असणारा १२) आंब्याचे जाळे; गायनातील एक राग; मोर; हरिण; हत्ती; भ्रमर १३) गळ्याची मागची बाजू; आदर १५) सत्यानाश; निर्वंश १६) मार देणारे; हानिकारक १७) उंच वाढणारा एक वृक्ष; ताल १९) नाकात घालावयाचा स्त्रियांचा एक दागिना २०) बेकरीत तयार होणारा एक खाद्यपदार्थ

शब्दगंध क्र. ७२८९ चे उत्तर



# * * * * * * मुलांचे विश्व * * * * * *

संकलक : ॲड.सौ. पूजा गुंदेचा

**सुविचार** : चिंता केल्याने नाही तर चिंतन केल्याने मार्ग निश्चित सापडतो.

## मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

### कोणती फळे पावसाळ्यात खाणे सर्वोत्तम आहेत?

पावसाळा ऋतू पाऊस आणि हिरवळ घेऊन येतो, परंतु या ऋतूमध्ये आजारांचा धोका देखील वाढतो. अशा परिस्थितीत, प्रत्येकाने आपल्या आहाराची विशेष काळजी घेतली पाहिजे कारण जेव्हा आहार योग्य असेल तेव्हाच आपले आरोग्य चांगले राहते आणि आपण निरोगी आणि ताजेतवाने वाटतो. जर आपण आजारी पडलो तर आपण या पावसाळ्याचा आनंद घेऊ शकणार नाही, म्हणून हे करण्यासाठी आपण चांगले खाणे आणि निरोगी राहणे महत्वाचे आहे. निरोगी राहण्यासाठी पावसाळ्यात काही फळांचा सेवन केल्याने आजार दूर राहतील.

डाळिंब हे हंगामी फळ नाही आणि ते सहसा सर्व ऋतूंमध्ये उपलब्ध असते. त्याची खासियत अशी आहे की तुम्ही ते कोणत्याही ऋतूमध्ये खाऊ शकता. डाळिंब हे शरीरात रक्त वाढवण्यासाठी एक महत्त्वाचे फळ मानले जाते आणि पावसाळ्यात त्याचे सेवन देखील विशेष फायदेशीर आहे. त्यात भरपूर लोह, व्हिटॅमिन सी आणि अँटीऑक्सिडंट्स असतात. या गोष्टी आपल्या शरीरातील रक्ताची कमतरता पूर्ण करतात आणि हिमोग्लोबिनची पातळी वाढवतात. पावसाळ्यात बाजारात नाशपाती सहज उपलब्ध होतात. हे साधे फळ आपल्या आरोग्यासाठी खूप फायदेशीर आहे. त्यात फायबर, व्हिटॅमिन सी आणि व्हिटॅमिन के असते. ते पचन सुधारते आणि बद्धकोष्ठतासारख्या समस्यांपासून आराम देते. या ऋतूत, तज्ञ अनेकदा हलके आणि सहज पचणारे अन्न खाण्याचा सल्ला देतात आणि नाशपाती या श्रेणीत अगदी योग्य बसतात. ते तुमची रोगप्रतिकारक शक्ती देखील वाढवते.

दररोज एक सफरचंद खा आणि डॉक्टरांना दूर ठेवा, ही म्हण आपण लहानपणापासून ऐकत आलो आहोत आणि ती प्रत्यक्षात खरी आहे. फायबर, जीवनसत्त्वे आणि खनिजांनी समृद्ध सफरचंद पचन सुधारते आणि पोटाच्या समस्या दूर ठेवते. पावसाळ्यात पोटाच्या समस्या अनेकदा उद्भवतात, अशा परिस्थितीत, आपण नियमितपणे सफरचंद खाल्ल्याने या समस्या टाळू शकतो. सफरचंद खाल्ल्याने आपली रोगप्रतिकारक शक्ती देखील वाढते आणि आपण हंगामी आजारांपासून सुरक्षित राहतो.

जामुन हे पावसाळ्यात आढळणाऱ्या हंगामी फळांपैकी एक आहे. पावसाळ्यात ते मुबलक प्रमाणात आढळते आणि सर्वांनाच त्याची गोड आणि आंबट चव आवडते. पण ते केवळ चविष्टच नाही तर एक आरोग्यदायी फळ देखील आहे. त्यात व्हिटॅमिन सी, लोह आणि अँटीऑक्सिडंट्स भरपूर प्रमाणात असतात. पावसाळ्यात आर्द्रतेमुळे बॅक्टेरियाचा धोका वाढतो, अशा परिस्थितीत जामुन पोटाच्या समस्या आणि संसर्गापासून तुमचे रक्षण करण्यास मदत करते. मधुमेहाच्या रुग्णांसाठी देखील जामुन खूप फायदेशीर मानले जाते.

## मुर्ख शेळ्या

एका जंगलात दोन शेळ्या राहत होत्या. आता दोघेही जंगलाच्या वेगवेगळ्या भागात गवत खात असत. त्या जंगलात एक नदीही वाहत होती, ज्याच्या मध्यभागी एक अतिशय अरुंद पूल होता. तसेच या पुलावरून एका वेळी फक्त एकच प्राणी जाऊ शकत होता.

एके दिवशी चरत असताना दोन्ही शेळ्या नदीकाठी पोहोचल्या. दोघांनाही नदी ओलांडून जंगलाच्या दुसऱ्या भागात जायचे होते. पण पुलाची रुंदी अरुंद असल्याने, एका वेळी फक्त एकच शेळी त्यातून जाऊ शकत होती, परंतु दोघेही मागे हटण्यास तयार नव्हते. यावर एक शेळी म्हणाली, आधी मला जाऊ दे, माझ्यानंतर तू पूल ओलांड. यावर दुसरी शेळी म्हणाली. 'नाही, आधी मला पूल ओलांडू दे, मग तू पूल ओलांडू शकतेस.' हे म्हणत असताना दोन्ही बकरी पुलाच्या मध्यभागी पोहोचल्या व भांडत होत्या. पहिल्या बकरीने म्हटले, 'मी आधी पुलावर आले, म्हणून मी आधी पूल ओलांडेन.' मग दुसऱ्या शेळीने लगेच उत्तर दिले, 'नाही, मी आधी पुलावर आले, म्हणून मी आधी पूल ओलांडेन.' त्यांचे भांडण वाढले.

या दोन्ही शेळ्यांना ते ज्या पुलावर उभे होते तो किती अरुंद होता हे अजिबात आठवत नव्हते. भांडत असताना, दोन्ही शेळ्या अचानक नदीत पडल्या आणि त्यांचा मृत्यू झाला.

तात्पर्य : भांडण केल्याने कोणाचेही चांगले होत नाही उलट, ते सर्वांनाच नुकसान पोहोचवते.

## जीवन का अमृत (भाग १)



### सामाजिक आचरण और नैतिक जीवन

तक उचित है। इस रास्ते पर मन को काबू में करना पड़ता है। आपने केवल इस बात की चर्चा की है कि आप पाँच नामों का जाप करते हैं। अगर आप अपनी डॉयरी (आत्म-निरीक्षण) भेजते, चाहे खाली ही 'सही और अपनी मुश्किलों के बारे में बताते, तो आपकी सभी कमियों और मुश्किलों से आपको अवगत करा दिया जाता, ताकि भविष्य में आपका मार्गदर्शन हो पाता। भजन-सिमरन में असफलता बहुत सी

(क्रमशः)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

## अंतरिक बल (भाग - २)

### आज्ञा चक्र

अपवित्रता के विचारों से एक नशेड़ी जैसा व्यक्ति हम बन जाते हैं। जैसे शराबी शराब के बिना तड़फता है। ऐसे ही व्यक्ति काम विकार के कारण बेचैन रहता है और अपराध कर बैठता है। अपवित्रता का मूल कारण है प्यार की कमी। हरेक व्यक्ति को मन में स्नेह देते रहो उन्हे मन में अपना भाई या बहिन समझो तो अपवित्रता परेशान नहीं करेगी। कोई भी नाकारात्मक विचार मबना देता है और हमारे व्यक्तित्व को बांध देता है। इसलिये सदैव कोई ना कोई अच्छा विचार मन में रखो। मैं कल्याणकारी हूं यह विचार मन में रहे तो कोई भी नाकारात्मक विचार नहीं आयेगा।

(क्रमशः)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## साहित्य सहवास - 'जबाबदारी...'

एका विद्यार्थ्याची दहावीची परिक्षा चालु होती. अचानक, रस्त्यावरच्या अपघातात त्याच्या वडिलांचे निधन झाले. काय करावं मुलाला काहीही सुचेना. वडिलांच्या आठवणीने डोळ्यांतले अश्रु थांबेनात. शिवाय तो, घरातला थोरला मुलगा. खरं तर तो लटलट कापु लागला. संपूर्णतः भयभीत झाला. त्यांच्या घराशेजारचे काका, त्या मुलाजवळ आले. त्यांच्या गळ्यात पडुन मुलगा मनसोक्त रडला. नाते वाईक, परिचित, जवळपासचे अनेकजण आले. त्या काकांनी ह्याक्षणी मुलाची नेमकी काय जबाबदारी आहे हे ओळखले. त्या मुलाला अगदी योग्य प्रकारे, त्याचं ऐकुन घेऊन समजावलं. काका म्हणाले, 'जे झालं ते आपण बदलु शकत नाही. पण आत्ता ह्याक्षणी तुला अत्यंत जबाबदारीने ही परिस्थिती हाताळायची आहे. आम्ही सगळे तुझ्या सोबत आहोतच. आत्ता ह्या क्षणी तू तन आणि मन शांत ठेव. तु रडत राहिलास तर तुझी धाकटी बहिण सुध्दा तुझ्याकडे पाहुन रडणार. जे झाल ते खूपच वाईट झालं आहे पण जबाबदारीने वागणं हेच योग्य. तुझी मनस्थिती मी समजु शकतो पण तु परिक्षेला जा. परिक्षा देणं ही तुझी आत्ताची महत्वाची जबाबदारी आहे.'

जमलेल्यापैकी आणखी दोघांनीही मुलाला हेच सांगितलं. ते काका मुलाला घेऊन शाळेत गेले. मुलगा परिक्षेसाठी वर्गात गेला. त्याचा पेपर लिहुन होईपर्यंत काका बाहेरच झाडाखाली बसले होते. मुलगा पेपर देऊन आला. काका, त्याला घेऊन घरी आले. अंत्यविधी झाला. पुढील दोन्हीही पेपरला काका त्याला घेऊन गेले. दिवसांमागुन दिवस जाऊ लागले. त्या दुःखातुन ते कुटुंब बाहेर यायला वेळ लागला. दरम्यान दहावीचा निकाल लागला. मुलगा चांगल्या गुणांनी उत्तीर्ण झाला. मुलगा म्हणाला, 'काका, तुम्ही त्यावेळी मला योग्य ते सांगितलं म्हणूनच मी पेपर लिहु शकलो. चांगल्या गुणांनी उत्तीर्ण झालो.' काका म्हणाले, 'तुला योग्य रितीने, त्या परिस्थितीत सांगणं, परिक्षेला घेऊन जाणं ही माझी जबाबदारी होती. ती जबाबदारी मी शेजारधर्म म्हणून, एक माणूस म्हणून योग्य प्रकारे पार पाडली एवढंच.'

सदर घटनेतून जबाबदारी पार पाडणं किती महत्वाचं आहे, एखाद्याचं जगणं सावरणार आहे हे लक्षात येतं. प्रत्येकाला अधिकार हवेत, हक्क हवेत पण जबाबदारी पार पाडण्याची वेळ येते तेव्हा जबाबदारी झटकायची कशी हे चांगल्याप्रकारे समजतं अथवा तशी कृती ते करतात. जबाबदारी स्वीकारली तरच आपल्यात जबाबदारपणा येईल. जबाबदारी घेणं, ती योग्य रितीने पार पाडणं हे फार महत्वाचं आहे गरजेचं आहे. असं समजुया की प्रत्येकजण जबाबदारी झटकु लागला तर ? एखादं कार्य नक्कीच पूर्ण होऊ शकणार नाही. कुटुंबात लहानग्यांची जबाबदारी, मोठ्या व्यक्ती घेतात. लहानग्यांची ही जबाबदारी पार पाडतांना, लहानग्यांना त्यांची जबाबदारी नेमकी काय आहे हे सांगावं लागतं, लक्षात आणुन द्यावं लागतं. आपले हक्क, अधिकार कोणते आहेत ह्याची माहिती असते पण कर्तव्य, जबाबदाऱ्या कोणत्या आहेत हे सुध्दा माहित असायलाच पाहिजे. नाही तर मग स्वार्थाचं कळतं पण कर्तव्य, जबाबदारीची जाणीव नसेल तर काय अर्थ आहे ? माझ्याशी परिचित एकजण नोकरी करतो. कर्तव्य, जबाबदारी पार पाडण्याच्या बाबतीत तो अगदी पक्का आहे. मध्यंतरी भेट झाली तेव्हा म्हणाला एखादा कर्मचारी अधिकार, हक्काच्या बाबतीत फारच जागरुक आहे पण वेळेवर काम सुरु करणार नाही. सकाळीच दोन - चार कर्मचारी स्वतः समोर बसवुन घेणार. अवांतर गप्पा मारणार. म्हणजेच स्वतःची जबाबदारी पार पाडायची नाहीच शिवाय ज्यांनी सकाळी मस्टरवर सही झाल्यावर काम सुरु करुन जबाबदारी कर्तव्य पार पाडणं गरजेचं आहे, त्यांचाही वेळ घ्यायचा. ऑफिसचं नुकसान करायचं. तो पुढे असंही म्हणाला की सदर कर्मचारी ऑफिसच्या वेळेत त्याची सगळी खाजगी कामं अगदी न चुकता, वर्षानुवर्षे करतो आहे.

ह्या त्याच्या अशा वृत्तीमुळे इतरही कर्मचारी त्याच्याकडे बोट दाखवुन ऑफिसच्या वेळेत त्यांची खाजगी कामं करु लागली आहेत. जिथं काम करतो तिथंच आपण फसवणार असु, गैरफायदा घेणार असु तर आपल्याला जबाबदारी ह्या शब्दाचा अभ्यास करण्याची नितांत आवश्यकता आहे. आणखीही ऑफिसेसमध्ये असा एखादा जबाबदारीची जाण आणि भान नसलेला कर्मचारी असतोच. अशांना जनाची तर नसतेच पण मनाचीही लाज वाटत नसते. जिथं आपलं कुटुंब पोट भरतं तिथंच गद्दारी करणार असु तर अशांना अधिकाऱ्यांनी समज देणं, ॲक्शन घेणं गरजेचं असतं. म्हातारी मेल्याचं दुःख नसतं. काळ सोकवायला नको. चला, आपली जबाबदारी आपण मनापासून, मिळणाऱ्या पगाराला बांधिल राहुन पार पाडुया हे प्रत्येक कर्मचाऱ्याने मनापासून ठरवलंच पाहिजे, तशी जबाबदारीची कृती केलीच पाहिजे. घरात पाच व्यक्ती आहेत एकाने :ची जबाबदारी झटकली तर काय होईल ?

(लेख क्र.५७२)

**- सुनील राऊत**
माळीगल्ली, भिंगार, अहिल्यानगर
मो.९८२२७५८३८३

## हसा आणि शतायुषी व्हा!

**गणू :** तू आज डॉक्टरांकडे जाणार होतास, काय झाले?

**मनू :** अरे उद्या जाईन, आज तब्येत जरा बरी नाही

## करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

❊ कोणत्या देशात जगातील सर्वात लांब काचेचा पूल बांधलेला आहे?
- व्हिएतनाम

**- अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

## आयुर्वेदीय बालसंस्कार

### बौद्धिक विकास कसा करावा?

कशाचे चित्र आहे, हे बाळाला चित्र दाखवता समजावून सांगावे. उदा. समजा हत्तीचे चित्र दाखविले, तर त्या वेळी हत्ती हा शब्द उच्चारावा. यामळे बाळा काळ्या रंगाचा विशाल हत्ती असतो, हे हळूहळू लक्षात येईल. चित्र दाखविण्याची, अक्षरे दाखविण्याची, खेळणी दाखविण्याची प्रक्रिया वारंवार दिवसातून तीन वेळेला करावी. पहिले सात दिवस दोन-तीन प्रकारची खेळणी अथवा चित्र दाखवावे. नंतर पुढील आठवड्यात दुसऱ्या प्रकारची खेळणी घ्यावी. कारण बाळाला एकच एक खेळणी अथवा चित्र आवडत नसते. सुरुवातीला बाळ कोणतीच प्रतिक्रिया देणार नाही,

**(क्रमशः)**

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहिल्यानगर मोबाईल नं- ८७९३४००४००

# वादळांचा वादळी इशारा

आज-काल सगळ्यांच्या तोंडी बदललेल्या हवामानाविषयी अशी चर्चा ऐकू येते की आम्ही आमच्या आयुष्यात कधीच इतका पाऊस पाहिला नाही. या वर्षी ८, ९ मे ला सुरू झालेला पाऊस आता नोव्हेंबर उजाडला, ७ महिने झाले तरी अजून थांबायचं नाव घेत नाही. सगळीकडे प्रचंड नुकसान होत आहे. आपला अन्नदाता शेतकरी पूर्णतः हवालदिल झालेला आहे. वर्षानुवर्ष भारतामध्ये १२ महिन्यांमध्ये ३ ऋतू असतात असे शिकवणाऱ्या भूगोलावर विश्वास ठेवायचा? कि पंचांगावर विश्वास ठेवायचा? कि हवामानावर खात्यावर विश्वास ठेवायचा? असा प्रश्न निर्माण झाला आहे.



व्यंगचित्र सुहासभाई मुळे

मागच्या आठवड्यात सर्व मीडियातून आणि रेडिओ दूरदर्शन वरून देखील सांगण्यात आले की मान्सून ने आता पूर्णपणे माघार घेतली असून पाऊस सर्व दूर थांबला आहे. ही सुखद बातमी कानातून आत जाते न जाते तोच बंगालच्या उपसागरात कमी दाबाचा पट्टा निर्माण झाला, आता परत पुढील आठवडाभर पाऊस पडणार, अशी बातमी धडकली.. ती बातमी संपते ना संपते तोच अरबी समुद्रात कमी दाबाचा पट्टा निर्माण झाला, आता थेट १० नोव्हेंबर पर्यंत मुसळधार पाऊस.. अशा बातम्यांनी सगळ्यांचा सगळ्यांवरचा विश्वास उडालेला आहे.

वास्तविक हवामानातला बदल एका रात्रीत होत नसतो गेल्या कित्येक वर्षापासून वारंवार हा अनुभव येतो आहे की, पावसाळा सप्टेंबर मध्ये कधी संपतच नाही, तो डिसेंबर पर्यंत लांबला जातोय.. आता सर्व शेतीची कामे पीक पाणी आणि इतर प्रशासकीय नियोजन खरे म्हणजे त्यानुसार बदलायला हवे, आता तर ८ महिने पावसाळा १ महिने हिवाळा आणि ३ महिने उन्हाळा असा क्रम सुरू झाला आहे., एवढा मोठा बदल व्हायचं कारण एकच आहे, ते म्हणजे प्रचंड प्रमाणामध्ये प्रदूषण.. प्रदूषणामध्ये मुळे होणारं तापमानातील वाढ.. तापमानातील वाढीमुळे वारंवार समुद्रामध्ये कमी दाबाचे पट्टे निर्माण होणे.. आणि प्रचंड पाऊस पडणे असे हे आताचे दुष्टचक्र थांबवणे आपल्या कुणाच्याच हातात राहिलेले नाही.

आंतरराष्ट्रीय मानकानुसार या वादळांना विशिष्ट नावं उदाहरणार्थ तितली, मोंथा अशी नाव देण्याची पद्धत अस्तित्वात आहे त्या अमेरिकन उपग्रह संस्थेला देखील आता या वादळांचे बारसं करताना अडचण यायला लागली आहे, कारण प्रत्येक आठवड्याला एक नवीनच वादळांचे बाळ जन्माला यायला लागले आहे. लोकसंख्येच्या सगळ्या सीमा या बुध्दीमान प्रगतिशील मानवाने पार केलेल्या असताना, या वादळांनी तरी कशाला मागे राहायचं? म्हणून ती वादळं धपाधप बाळं जन्माला घालून त्यांची पण लोकसंख्या वाढवत आहेत. कदाचित!

ऑक्टोबर, नोव्हेंबर, डिसेंबर पर्यंत वादळांचा आणि पावसाचा कहर आपल्याकडे काही नवीन नाही. भारतीय इतिहासा मधल्या उपलब्ध नोंदीनुसार सगळ्यात भयानक चक्रीवादळ ऑक्टोबर १९३७ मध्ये बंगालच्या उपसागरात निर्माण झालं होतं, ते वादळ जेव्हा कलकत्त्यावर आणि आसपासच्या सुमारे शंभर किलोमीटर परिसरावर चाळीस फूट उंचीच्या लाटा घेऊन धडकले होते, तेव्हा नेमका दुर्दैवी योगायोग म्हणजे त्याच क्षणी त्या परिसरामध्ये मोठा भूकंप झाला होता, आणि त्यावेळच्या लोकसंख्या प्रमाणे आकडेवारी नुसार सुमारे तीन लाख लोक मरण पावले होते, म्हणजे आजच्या भाषेत जवळजवळ २५ लाख लोक.. यावरून या वादळाची तीव्रता लक्षात येते, असेच २२ डिसेंबर १९६४ रोजी रामेश्वरला एका चक्रीवादळाने मध्यरात्री वेढले होते, आणि त्याच्या तडाखा मध्ये मंडप गाव ते रामेश्वर दरम्यान असलेला तीनशे मीटर लांबीचा रेल्वेचा पूल त्यावरून चाललेल्या पॅसेंजर ट्रेन सह वादळामध्ये गायब झाला होता... रेल्वेत खचाखच भरलेल्या प्रवाशांना ओरडायला देखील संधी मिळाली नव्हती, तेव्हा त्या परिसरामध्ये २४ तासात २५० मिलिमीटर इतका प्रचंड पाऊस आणि वेगवान वारे वाहत होते, अगदी तसेच मे १९६३ मध्ये पॅसिफिक महासागरात निर्माण झालेले नेट नावाचे चक्रीवादळ अचानक पणे सगळ्या सीमा ओलांडून किनारपट्टीवरून आपल्या शहराच्या शेजारी ओतूरकडे सरकले आणि ओतुर गावाचा त्याने नकाशाच बदलून टाकलेला अनेकांना माहीत नसेल. आज आपण पाहतो ते ओतूर गाव पूर्णपणे वेगळे आहे. अगदी याच पद्धतीने १२ नोव्हेंबर १९७० मध्ये बांगलादेशामध्ये जे वादळ झाले होते त्या वादळात देखील तीन लाख लोक मृत्यू पावले होते, अंगावर पांघरुन घालावे इतक्या सहजतेने ४५ फूट इतक्या प्रचंड उंचीच्या लाटा घेऊन समुद्र बांगलादेशावर चालुन आला होता. अवघ्या पंधरा मिनिटात होत्याचे नव्हते झाले होते.

चालू वर्षी वातावरणाचा जबरदस्त बदल अशा वादळांच्या जन्माला पोषकच ठरतो आहे, यात शंका नाही, या वर्षी सरासरी प्रत्येक ठिकाणी दोन ते तीन डिग्री तापमान वाढ ही प्रचंड समजली जाते, त्यामुळे अनेक नवीन नवीन वादळांची बाळे जन्म घेत आहेत, ही वादळे या प्रगत तंत्रज्ञानाला ही चकवा देताना आढळून येत आहेत, हे १० वर्षांपूर्वीच्या गुजरातच्या वादळाने सिद्ध केले आहे. फिलिपीन्स या देशाला तर असल्या वादळांना जवळजवळ दरवर्षी तोंड द्यावे लागते, परंतु मुख्य म्हणजे त्यामुळे तिथे कुठलीही दळणवळण सेवा ठप्प होत नाही, हे विशेष. तसे टायफुल किंवा टोर्नाडो सारखे एखादे जरी वादळ आपल्या देशात आणि विशेष करून महाराष्ट्रात जर आले, तर मला वाटते, रस्ते, रेल्वे टेलिफोन आणि वीजपुरवठा हे सुरळीत व्हायला किमान सहा महिने- वर्ष तरी लागेल, कारण छोट्या छोट्या वादळां पुढे आपल्या कडील इलेक्ट्रिकचे खांब जमिनीवर साक्षात लोटांगण घालतात, आपल्या अहिल्यानगर शहरात तर वीज मंडळांनी विलक्षणच सिस्टीम बसवलेली असावी असे वाटते, कारण आकाशातून एखाद्या काळ्या ढगातून चुकून दोन चार थेंब जरी पडले, तरी शहरामध्ये वीज गायब होते, जोरदार वारा सुटला तरी विजेच्या तारा एकमेकांना मिठी मारतात, आणि ठिणग्या उडवत शहरात अंधार पसरवतात,

सलूनमध्ये दाढी झाल्यावर जसा तोंडावर थोडा स्प्रे मारतात तेवढा चमचाभर जरी पाऊस झाला तरी आपल्याकडे रस्त्यावर चौका चौकात पोहण्याचे तलाव तयार होतात., तेव्हा असली वादळे आपल्याकडे कधीच येऊ नयेत, हीच प्रार्थना आहे. परंतु या वादळांसारखेच लहरी आणि बे भरवशाचे सगळे प्रशासकीय अधिकारी व पुढारी आपल्याला लाभल्यामुळे आणि प्रशासकीय आपत्कालीन व्यवस्थेमध्ये वेळेनुसार कुठलीही सुधारणा न केल्यामुळे एकाच दिवशी आपल्याला पहाटे हिवाळा दुपारी उन्हाळा रात्री पावसाळा असे सगळे ऋतू पाहायला मिळत आहेत. आणि सीना नदीला आलेला पाहायला आपण जायच्या ऐवजी ती सीना नदीच आपलं घर पाहायला आपल्या घरात येत आहे.

**– सुहासभाई मुळे, अध्यक्ष जागरूक नागरिक मंच, अहमदनगर**



सर्जेपुरा येथे कराचीवाला बेकरी समोर माजी रणजीपटू अजीम काझी यांच्या ४७ (फोर्टी सेवन) स्पोर्ट्स् या आधुनिक स्पोर्टस् दालनाचा शुभारंभ उद्योजक नरेंद्र फिरोदिया यांच्या हस्ते करण्यात आला.

# क्रिकेटर आणि माजी रणजीपटू अजीम काझी यांच्या नगरमधील 'फोर्टी सेवन' स्पोर्टस् दालनाचा शुभारंभ

नगर – नगर शहरातील सर्जेपुरा येथे कराचीवाला बेकरी समोर माजी रणजीपटू अजीम काझी यांच्या ४७ (फोर्टी सेवन) स्पोर्ट्स् या आधुनिक स्पोर्टस् दालनाचा शुभारंभ उद्योजक नरेंद्र फिरोदिया आणि जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे सचिव गणेश गोंडाळ यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी प्रा. माणिकराव विधाते, वसीम हुंडेकरी, भरत पवार, करीम हुंडेकरी, विनीत म्हस्के, जुनेद शेख, मोहसिन सैफी, शाहिद काझी, सर्फराज बांगडीवाले, सनीत मुथा, गौरव पितळे, सॉलोमन अलसमराव, महेश गलांडे, जीवन कांबळे, अंजुम इनामदार, शब्बीर काझी, बशीर काझी आदी उपस्थित होते.

या दालनामध्ये क्रिकेटसह सर्व प्रकारच्या खेळाडूंना लागणारे संपूर्ण साहित्य- बॅट, बॉल, स्पोर्टस् शूज, कीट, जर्सी तसेच फिटनेससाठी आवश्यक वस्तू उपलब्ध होणार आहे.

उद्‌घाटनावेळी बोलताना उद्योजक नरेंद्र फिरोदिया म्हणाले, आजच्या काळात युवकांमध्ये स्पोर्टस्‌ची आवड झपाट्याने वाढत आहे. पण दर्जेदार साहित्य मिळवण्यासाठी खेळाडूंना बाहेरच्या शहरांत जावे लागते. आता फोर्टी सेवन स्पोर्टस्मुळे नगर शहरातील खेळाडूंना कंपनीचे ब्रँडेड साहित्य अल्प दरात स्थानिक पातळीवरच मिळणार आहे, हे शहरासाठी अभिमानास्पद आहे.

या वेळी हुंडेकरी अकॅडमीचे प्रमुख उद्योजक करीम हुंडेकरी म्हणाले, अहिल्यानगरमध्ये क्रिकेटची परंपरा दीर्घकाळापासून समृद्ध आहे. १७-१८ वर्षांपूर्वी माजी आमदार कै. अरुण जगताप यांच्या हस्ते हुंडेकरी अकॅडमीची स्थापना झाली. या अकॅडमीतून अनेक खेळाडूंनी जिल्हा व राज्यस्तरावर नाव कमावले असून, अजीम काझी हे त्यातील एक यशस्वी रणजीपटू आहेत. फोर्टी सेवन स्पोर्टस् दालन हे तरुण खेळाडूंसाठी प्रेरणास्थान ठरेल. तसेच अंडर-१४ पासून खुल्या वयोगटा पर्यंत च्या खेळाडूंसाठी अकॅडमीमार्फत दर्जेदार प्रशिक्षण सुरू आहे.

माजी रणजीपटू अजीम काझी म्हणाले की, या स्पोर्टस् दालनाच्या माध्यमातून शहरातील खेळाडूंना दर्जेदार व ब्रँडेड साहित्य कमी दरात मिळावे हा हेतू आहे. स्पोर्टस् क्षेत्रातील तरुणांना प्रोत्साहन मिळावे, हेच आमचे ध्येय असल्याची भावना व्यक्त केली तसेच सुरु झालेले 'फोर्टी सेवन स्पोर्टस्' हे केवळ एक दुकान नसून खेळ संस्कृतीला चालना देणारे एक व्यासपीठ ठरेल. आगामी काळात या माध्यमातून स्थानिक खेळाडूंना दर्जेदार साहित्य, प्रशिक्षण आणि प्रोत्साहन यांचे एकत्रित केंद्र उपलब्ध होणार आहे.

# महापालिका निवडणुकीसाठी राज्य निवडणूक आयोगाकडून आरक्षण सोडतीचा कार्यक्रम जाहीर, ११ नोव्हेंबर रोजी प्रभागनिहाय आरक्षणाची सोडत काढणार, २४ नोव्हेंबरपर्यंत हरकतींसाठी मुदत

नगर – राज्य निवडणूक आयोगाच्या मान्यतेनुसार अंतिम प्रभाग रचना प्रसिद्ध करण्यात आली आहे. तसेच, मतदार यादी तयार करण्याचा कार्यक्रम जाहीर होऊन त्याचे काम सुरू करण्यात आले आहे. आता राज्य निवडणूक आयोगाने प्रभाग आरक्षण निश्चिती व सोडतीचा कार्यक्रम जाहीर केला आहे. त्यानुसार ८ नोव्हेंबर रोजी आरक्षण सोडतीची जाहीर सूचना प्रसिद्ध होऊन ११ नोव्हेंबर रोजी प्रभागनिहाय आरक्षणासाठी सोडत काढण्यात येणार असल्याची माहिती आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे यांनी दिली.

**आरक्षण सोडतीचा कार्यक्रम पुढीलप्रमाणे :**

१) आरक्षित जागांची संख्या निश्चित करुन त्यास राज्य निवडणूक आयोगाची मान्यता घेण्याकरीता प्रस्ताव सादर करणे – ३० ऑक्टोबर ते ४ नोव्हेंबर

२) आरक्षण सोडतीची जाहिर सूचना वृत्तपत्रात प्रसिध्द करणे – ८ नोव्हेंबर

३) आरक्षणाची सोडत काढून सोडतीचा निकाल राज्य निवडणूक आयोगाच्या मान्यतेसाठी सादर करणे – ११ नोव्हेंबर

४) प्रारुप आरक्षण हरकती व सूचना मागविण्यासाठी विहित नमुन्यात प्रसिध्द करणे – १७ नोव्हेंबर

५) प्रारुप आरक्षण हरकती व सूचना मागविण्याचा अंतिम दिनांक – २४ नोव्हेंबर

६) प्रारुप आरक्षणावर प्राप्त झालेल्या हरकती व सूचनांवर विचार करुन महानगरपालिका आयुक्त यांनी निर्णय घेणे – २५ नोव्हेंबर ते १ डिसेंबर

७) आयोगाच्या मान्यतेनंतर अंतिम आरक्षण विहित नमुन्यात शासन राजपत्रात प्रसिध्द करणे – २ डिसेंबर



नंदनवन मित्र मंडळ टिळक रोड व शहर शिवसेना पक्षाच्या वतीने आयोजित किल्ले बनवा स्पर्धेचे पारितोषिक वितरण झाले. (छाया – लहू दळवी)

# किल्ले बनवा स्पर्धेच्या माध्यमातून छत्रपती शिवाजी महाराजांचे शौर्य युवकांना प्रेरणादायी

**सुवर्णाताई जाधव यांचे प्रतिपादन; नंदनवन मित्र मंडळ टिळक रोड व शहर शिवसेना पक्षाच्या वतीने आयोजित किल्ले बनवा स्पर्धेचे पारितोषिक वितरण**

नगर – आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगामध्ये विद्यार्थी मोबाईल टीव्ही कडे आकर्षित झाला आहे, मैदानी खेळापासून लांब गेला आहे, दिवाळी सुट्टीमध्ये विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळावा यासाठी प्रभागातील शालेय विद्यार्थ्यांसाठी किल्ले बनवा स्पर्धेचे आयोजन केले होते, छत्रपती शिवाजी महाराज यांनी निर्माण केलेले विविध किल्ल्यांची प्रतिकृती विद्यार्थ्यांनी हुबेहूब साकारली होती, या माध्यमातून आपला इतिहास, संस्कृती, परंपरा जोपासली जाते, तसेच छत्रपती शिवाजी महाराजांचे शौर्य युवकांना प्रेरणादायी आणि ऊर्जा देणारे ठरते असे प्रतिपादन मनपा स्थायी समिती माजी सभापती सुवर्णा जाधव यांनी केले.

नंदनवन मित्र मंडळ टिळक रोड व शहर शिवसेना पक्षाच्या वतीने प्रभागातील शालेय विद्यार्थ्यांसाठी आयोजित किल्ले बनवा स्पर्धेचे पारितोषिक वितरण सुवर्णा जाधव यांच्या हस्ते झाले. यावेळी दत्ता जाधव, माजी नगरसेवक प्रशांत गायकवाड, देवेंद्र आगरकर, देवकी भापकर, महेश मोहिते, राज जाधव, कपिल जाधव, अनिल जाधव, आदित्य जाधव, कौस्तुभ ससाणे व गुणवंत विद्यार्थी, पालक उपस्थित होते.

दत्ता जाधव म्हणाले की प्रभाग मधील ४५ शालेय विद्यार्थ्यांनी किल्ले बनवा स्पर्धेमध्ये भाग घेतला होता त्यांनी विटा, दगड, माती एकत्रित गोळा करून किल्ल्यांची प्रतिकृती उभी केली, आम्ही किल्ले पाहण्यासाठी गेलो असता असे वाटले की आपण खरोखरचे किल्ले पाहिला आलो आहे या किल्ल्यांच्या माध्यमातून छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास आपल्याला खूप काही प्रेरणा देऊन जातो, छत्रपती शिवाजी महाराजांचा आदर्श आजच्या पिढीला ऊर्जा देणारा आहे.

किल्ले बनवा स्पर्धेसाठी निवड प्रथम, द्वितीय, तृतीय व उत्तेजनार्थ विद्यार्थ्यांना रोख रक्कम, सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले, या किल्ल्यांचे अमोल शिंदे, प्रियंका शेळके, सुनीता कोरडे यांनी परीक्षण केले.

यावेळी प्रशांत गायकवाड यांनी मनोगत व्यक्त केले.

# अखिल भारतीय आंतरविद्यापीठ मल्लखांब स्पर्धेत नगरचा ओम सानप देशात दुसरा

**खेलो इंडिया आंतरविद्यापीठ स्पर्धेसाठी निवड**



अखिल भारतीय आंतरविद्यापीठ मल्लखांब स्पर्धेत निवड झालेले खेळाडू.

नगर – चेन्नई येथे नुकतेच झालेल्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ मल्लखांब स्पर्धेत अहिल्यानगर शहरातील ओम घनश्याम सानप या खेळाडूने देशात द्वितीय क्रमांक पटकावून शहराचे नाव उंचावले आहे. ओम सानपची या वर्षी होणाऱ्या खेलो इंडिया आंतरविद्यापीठ स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

या राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेत देशभरातील ६० विद्यापीठांमधील मल्लखांबपटूंनी सहभाग घेतला होता. स्पर्धेत मुंबई विद्यापीठ संघाने प्रथम क्रमांक, तर पुणे विद्यापीठ संघाने द्वितीय क्रमांक मिळविला. ओम सानप हा पुणे विद्यापीठ संघातील महत्त्वाचा खेळाडू ठरला.

पुणे विद्यापीठाच्या मुलींच्या संघानेदेखील द्वितीय क्रमांक पटकावला. या संघामध्ये अहिल्यानगरच्या स्नेहल भोसले व प्राची खळकर या दोन्ही खेळाडूंचा सहभाग होता. या खेळाडूंच्या उत्कृष्ट कामगिरीमुळे नगर जिल्ह्याचा मल्लखांब क्षेत्रातील प्रभाव आणखी वाढला आहे.

ओम सानप हा सारडा महाविद्यालय, येथील विद्यार्थी असून, तो महावीर मल्लखांब व योगा ट्रेनिंग सेंटरचा खेळाडू आहे. यापूर्वी त्याने खेळो इंडिया बीच गेम्स स्पर्धेत रौप्य पदक पटकावले होते. ओमला या यशाच्या वाटचालीत मुख्य प्रशिक्षक उमेश झोटिंग, मल्लखांब प्रशिक्षक आप्पा लाढाने, राष्ट्रीय खेळाडू व प्रशिक्षिका प्रणिता तरोटे तसेच राष्ट्रीय कीर्तीचे प्रशिक्षक सुनील गंगावणे यांचे मार्गदर्शन लाभले.

ओमच्या या कामगिरीबद्दल सारडा कॉलेजचे क्रीडा संचालक प्रा. संजय धोपवकर, ज्युनिअर कॉलेजचे क्रीडा विभाग प्रमुख प्रा. संजय साठे, संघाचे टीम मॅनेजर अमित जीनसीवाले, तसेच अहमदनगर जिल्हा मल्लखांब असोसिएशनचे अध्यक्ष राजकुमार धोत्रे, सचिव अनंत रिसे, खजिनदार होनाजी गोडळकर, राष्ट्रीय खेळाडू नंदेश शिंदे व राष्ट्रीय पंच निलेश कुलकर्णी यांनी अभिनंदन केले



सावेडी ज्येष्ठ नागरिक मंचच्या वतीने कथाकथनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. याप्रसंगी मालिनी गाडेकर यांचा सत्कार करताना मंचचे उपस्थित कार्यकारणी सदस्य.

# मानवी जीवनात नामस्मरणाला अत्यंत महत्त्व

**सौ. मालिनी गाडेकर यांचे प्रतिपादन**

नगर – ज्येष्ठांनी या वयात भूतकाळातील आठवणी काढत बसून आपला अमूल्य वेळ फुकट घालवता कामा नये. कोणाचाही राग, द्वेष, मत्सर न करता, प्रत्येक गोष्टीचा सकारात्मक विचार करून आयुष्याची वाटचाल करावी. आपले आवडते छंद जोपासत चांगला आहार विहार याबरोबरच परमेश्वराचे नामस्मरणालाही तितकेच महत्त्व दिले पाहिजे. कारण मानवी जीवनात नामस्मरणाला अत्यंत महत्त्व आहे, असे प्रतिपादन सौ. मालिनी गाडेकर यांनी केले.

सावेडी ज्येष्ठ नागरिक मंचच्या वतीने कथाकथनाचा कार्यक्रम आयोजित केला होता. याप्रसंगी स्टेट बँकेचे अधिकारी हेमंत कोल्हटकर, मनोहर केसकर, मोईन परोपकारी, सर्वोत्तम क्षीरसागर विनायक मुळे, श्रीकांत नाईक, शोभा घुमरे, अशोक काळे तसेच मंचचे कार्यकारणी सदस्य व सभासद यावेळी उपस्थित होते.

त्यापुढे म्हणाल्या की, जीवनात दानधर्मा बरोबरच समाज सेवेलाही अत्यंत महत्त्व आहे. आपल्याला जग जिंकायचे आहे तर ते कसे जिंकायचे तर सद्गुणांनी, प्रेमाने व निस्वार्थ भावनेने. अशा पद्धतीने मानवी जीवनाचे महत्व सांगत, उपस्थित श्रोत्यांना सौ. मालिनी गाडेकर यांनी उद्‌बोधन केले.

कार्यक्रमाची प्रास्ताविक मंचाचे अध्यक्ष शरद कुलकर्णी यांनी केले. सूत्रसंचालन चारुशीला करवंदे यांनी केले तर पाहुण्यांच्या परिचय पुष्पा चितांबर यांनी करून दिला. बाजीराव जाधव यांनी आभार मानले.

# उमेदीच्या काळात योग्य दिशा निवडल्यास ध्येय प्राप्ती निश्चित मिळते

**मौ. आझाद रजा यांचे प्रतिपादन**



साकीब पिरजादे यांची मुंबई उच्च न्यायलयाच्या आदरणीय न्यायमूर्ती यांच्या स्विय सहाय्यक राज्यपतत्रीत अधिकारी वर्ग एक पदी निवड झाल्याबद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला. (छाया – अमित मन्यार)

नगर – शिक्षण हेच यशाची खरी गुरुकिल्ली आहे. प्रत्येक तरुणांनी आपल्या उमेदिच्या काळात योग्य दिशा निवडल्यास ध्येय प्राप्ती निश्चित मिळते. कठोर परिश्रम व मेहनतीच्या बळावर हे शक्य आहे. शालेय जीवनामध्ये खेळ व्यायाम यांना महत्त्व देत स्पर्धा परीक्षांचा अभ्यास केला तर अनेक तरुण शासनाच्या उच्च पदावर विराजमान होतील. प्रत्येक पालकाने आपल्या पाल्याच्या आवडीचे क्षेत्र योग्य वेळी निवडले तर अनेक पाल्यांचे भविष्य उज्वल होईल. आपल्या पाल्यावर कोणतीही दडपण न टाकता त्याच्या निवडीच्या क्षेत्रामध्ये त्याला काम करण्याची संधी दिल्यास तो आपले ध्येय निश्चितपणे गाठू शकतो. मुंबई उच्चन्यायलायच्या आदरणीय न्यायाधीश यांच्या स्विय सहाय्यक राजपत्रित अधिकारी वर्ग एक साठी राज्यात १२ क्रमांकवर निवडलेले साकीब पिरजादे हे मूर्तीमंत उदाहरण आहे. अशा उल्लेखनीय कामगिरीचा आदर्श इतर तरुणांनी घ्यावाअसे प्रतिपादन केडगाव शाही मस्जीदचे मौलाना आझाद रजा यांनी केले

केडगावचे रहिवासी असलेले व सध्या जिल्हा न्यायालय येथे स्टेनोग्राफर म्हणून कार्यरत असलेले साकीब पिरजादे यांची मुंबई उच्च न्यायलयाच्या आदरणीय न्यायमूर्ती यांच्या स्विय सहाय्यक राज्यपतत्रीत अधिकारी वर्ग एक पदी निवड झाल्याबद्दल अभिनंदन पर सत्कार सोहळ्यात ते बोलत होते. यावेळी कार्यक्रमास शाही मस्जीद केडगाव येथील ट्रस्टी हाजी उस्मान गनी मनियार, हाजी अकबर पठाण, मौलाना आझाद रजा रफिकभाई, मेजर दिलावर इनामदार, अन्सार सय्यद, डॉ. समीर सय्यद, शब्बीर शेख मुन्नवर (मुन्ना), सय्यद बशीरभाई नजीरहुसेन पिरजादे, जावेद पठाण, हाजी यासीनभाई, आतीश पठाण, हमीद सय्यद अन्वर खान, तारमोहंमद पेन्टर, बबलू पठाण, आकीर पठाण, हाजी नूरमोहंमद शेख, अब्दूल रहेमान आदी उपस्थित होते.

पुढे बोलताना मौलाना रजा म्हणाले की केडगावच्या शिरपेचात हा एक मानाचा तुरा साकीब पिरजादे यांनी रोवला आहे. साकीब पिरजादे यांचे पालक नजीरहुसेन पिरजादे हे देखील अहमदनगर न्यायालय येथे स्टेनोग्राफर वर्ग एक या पदावर कार्यरतआहेत त्यांचा व परिवारातील सर्व सदस्यांचा या यशामागे तेवढाच मोलाचा वाटा आहे. त्यांच्या भक्कम पाठिंब्यावरच हे यश तो गाठू शकला त्यांचेही ट्रस्टीच्या वतीने अभिनंदन करतो व भविष्यात देखील केडगाव मधून असेच अनेक तरुण स्पर्धा परीक्षेच्या माध्यमातून शासकीय उच्च पदावर विविध स्पर्धातून निवडून जावेत व राज्याची तसेच देशाची सेवा त्यांच्या हातून घडो असेही त्यांनी यावेळी सांगितले.

सत्कारमूर्ती साकीब पिरजादे यांनी सांगितले की माझा, माझ्या कुटुंबीयांच्या वतीने केलेला सत्कार हा मला नेहमीच जबाबदारीची जाणीव करून देईल. मला दिलेला मानसन्मान माझ्या सेवा कालखंडात नेहमीच उत्साह चैतन्य निर्माण करणारा ठरेल. राज्य शासनाकडून माझी ज्या पदावर नेमणूक झाली आहे त्या पदासाठी मी नेहमीच प्रामाणिकपणे व इमानदारीने काम करेल व पदाला न्याय देईल असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन एफसीआयचे सेवानिवृत्त व्यवस्थापक हाजी मणियार भाऊसाहेब यांनी केले. रफिकभाई यांनी आभार मानले.

# हिंदूंनी हिंदुत्वाशी बांधिलकी जपत देश हिंदू राष्ट्र होण्यासाठी काम करावे

## खा. मेघा कुलकर्णी यांचे प्रतिपादन; विचार भारतीच्या मातृशक्तीचा जागर उपक्रमाचा समारोप



विचार भारतीच्या वतीने घेण्यात आलेल्या 'मातृशक्तीचा जागर करूया आदर्श परिवार घडवूया' या जनजागृतीपर कार्यक्रमाच्या समारोप प्रसंगी शहरातील महिलांना मार्गदर्शन करताना राज्यसभेच्या खासदार मेघा कुलकर्णी.


नगर – मातृशक्तीचा जागर झाल्यास ती जगाचा व देशाचा जागर करील. यासाठी महिलांनी स्वतःचे महत्त्व जाणून आत्मसाक्षात्कार करून घ्या. तुम्ही जिजामाता झाल्या तरच शिवबा घडतील. एक महिला कशी क्रांती करू शकते हे जिजामाता व अहिल्यादेवींनी दाखवून दिले आहे. मदर टेरेसांनी देशात रुग्णसेवा करत करत धर्मांतरासाठीच कार्य केले. त्यामुळे महिलांनी सुजाण व्हावे. शाळेत मुलांना काहीही शिकवले गेले तरी तुम्ही जो सत्य व खरा इतिहास आहे तोच मुलांना सांगावा. यासाठी धर्माचा अभ्यास करून मुलांनाही धर्माचे ज्ञान द्या. येणाऱ्या काळात मोठ्या प्रमाणात धर्मांतराचे प्रमाण वाढणार आहे. त्यामुळे जास्तीत जास्त जागृत राहून हिंदूंनी हिंदुत्वाशी बांधिलकी जपत देश हिंदू राष्ट्र होण्यासाठी काम करावे. विचार भारतीच्या या मातृशक्तीचा जागर उपक्रमामुळे महिलांमध्ये स्फुल्लिंग पेटले आहे, असे प्रतिपादन राज्यसभेच्या खासदार मेघा कुलकर्णी यांनी करून हिंदूनी हिंदूंच्या दुकानातूनच वस्तूंची खरेदी करावी, असेही आवाहन केले.

अहिल्यानगरच्या विचार भारती संस्थेच्या वतीने नुकत्याच झालेल्या नवरात्र उत्सवात शहरात 'मातृशक्तीचा जागर करूया आदर्श परिवार घडवूया' हा जनजागृतीपर कार्यक्रमांचे आयोजन केले होते. या कार्यक्रमाचा समारोप माऊली सभागृहात राज्यसभेच्या खासदार मेघा कुलकर्णी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या कार्यक्रमाने झाला. यावेळी वक्त्या हभप हिराताई मोकाटे महाराज यांच्यासह शहरातील महिला भजनी मंडळ, बचत गट आणि नवरात्र उत्सव मंडळांच्या महिला पदाधिकारी उपस्थित होत्या. खा.कुलकर्णी यांच्या हस्ते महिला सर्व महिला भजनी मंडळांचा विशेष सन्मान विचार भारताच्या वतीने करण्यात आला. तसेच गोसेवा व गो संवर्धनाची सामुहिक शपथही यावेळी उपस्थित महिलांना देण्यात आली.

यावेळी हभप हिराबाई मोकाटे यांनी उपस्थित महिलांना मार्गदर्शन करून अध्यात्म, धर्म व देशासाठी जास्तीत जास्त काम करून येणाऱ्या पिढीला घडवावे, असे आवाहन करून हिंदू संस्कृतीची माहिती दिली. या कार्यक्रमात विविध क्षेत्रात कतृत्वाने कार्य करणाऱ्या डॉ.सुचित्रा धामणे, धनश्री खरवंडीकर, वनिता खानविलकर व मनीषा बारवकर यांचा विशेष मानपत्र देऊन सन्मान करण्यात आला.

प्रास्ताविकात उपक्रम प्रमुख पुष्कर कुलकर्णी यांनी उपक्रमाची माहिती दिली. मंदाकिनी गायकवाड व सुवर्णा नागोरी यांनी पाहुण्यांचा परिचय दिला. पुष्पा बोरुडे यांनी स्वागत केले. कार्यक्रमाचे नियोजन मनीषा मुळे, भावना लांडगे, रुपाली मोहिते, माया वाकळे, दिपाली दिडवाणीया व रूपाली वारे आदींनी केले.

# वर्धमान महावीर कॉलेज ऑफ ऑप्टोमेट्री येथे डिप्लोमा अभ्यासक्रमासाठी प्रवेश प्रक्रिया सुरू



नगर – आताच्या काळात नेत्र विज्ञान क्षेत्रात चांगल्या करिअरच्या अनेक संधी उपलब्ध झाल्या आहेत. डोळे तपासणी, चष्म्याचा नंबर काढणे, काचा बनवणे अशा तांत्रिक अभ्यासासाठी ऑप्टोमेट्री अभ्यासक्रम उपयुक्त आहे. यादृष्टीने आनंदऋषीजी हॉस्पिटल संलग्नित वर्धमान महावीर कॉलेज ऑफ ऑप्टोमेट्री (आनंदऋषीजी नेत्रालय) येथे डिप्लोमा इन ऑप्टोमेट्री अभ्यासक्रम सुरू झाला आहे. दोन वर्षांच्या या अभ्यासक्रमासाठी प्रवेश प्रक्रिया सुरू झाली असून जीवशास्त्रासह बारावी उत्तीर्ण विद्यार्थ्यांना या अभ्यासक्रमासाठी प्रवेश मिळणार आहे. सदर कॉलेज नाशिक येथील एमएचयुएसशी संलग्न आहे.

डिप्लोमा इन ऑप्टोमेट्री या दोन वर्षांच्या अभ्यासक्रमात ६ महिने इंटर्नशिपचा समावेश आहे. इंग्रजी भाषेत अध्यापन केले जाते. इंग्रजी कौशल्य, व्यक्तिमत्त्व विकास, शिष्टाचार प्रशिक्षणासह आधुनिक शिक्षणाचा यात समावेश आहे.

या संधीचा इच्छुक विद्यार्थ्यांनी लाभ घ्यावा असे आवाहन करण्यात आले आहे. सदर अभ्यासक्रम चालवणारे हे नगर जिल्ह्यातील पहिलेच कॉलेज आहे. या अभ्यासक्रमासाठी २० जागा असून प्रथम येणाऱ्यांना प्राधान्य देण्यात येणार आहे. प्रवेशासाठी ३० ऑक्टोबर पर्यंत अंतिम मुदत आहे.

प्रवेश प्रक्रिया व अधिक माहितीसाठी संपर्क वर्धमान महावीर कॉलेज ऑफ ऑप्टोमेट्री, आनंदऋषीजी नेत्रालय, आनंदऋषीजी मार्ग अहिल्यानगर, मो. ८६८६४०१५१५/८६८६३०१५१५.



दक्षता जनजागृती सप्ताहानिमित्त अधिकारी, कर्मचाऱ्यांनी घेतली भ्रष्टाचारविरोधी प्रतिज्ञा घेतली.

# दक्षता जनजागृती सप्ताहानिमित्त अधिकारी, कर्मचाऱ्यांनी घेतली भ्रष्टाचारविरोधी प्रतिज्ञा

नगर – राज्यात दरवर्षी 'दक्षता जनजागृती सप्ताह' आयोजित करण्यात येतो. यावर्षी २७ ऑक्टोबर ते २ नोव्हेंबर या कालावधीत दक्षता जनजागृती सप्ताहाचे आयोजन करण्यात आले. त्यानिमित्ताने अहिल्यानगर येथील मध्यवर्ती प्रशासकीय इमारतीत भ्रष्टाचारविरोधी प्रतिज्ञा देण्याचा कार्यक्रम घेण्यात आला.

प्रशासकीय इमारतीच्या प्रांगणात आयोजित कार्यक्रमात लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे पोलीस उपअधीक्षक अजित त्रिपुटे यांनी उपस्थित अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना 'भ्रष्टाचाराविरुद्ध लढा देण्याची' प्रतिज्ञा दिली.

या प्रसंगी तहसीलदार संजय शिंदे, धर्मादाय विभागाचे उपायुक्त नवनाथ जगताप, सहायक धर्मादाय आयुक्त विशाल झेंडे तसेच मध्यवर्ती प्रशासकीय इमारतीमधील सर्व कार्यालयांचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# १६ वर्षांनी एकत्र आलेल्या माजी विद्यार्थ्यांकडून आठवणींना उजाळा



पिंपळगाव पिसा (ता. श्रीगोंदा) येथील रेणुका देवी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील २००८–०९ च्या बारावीच्या विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा पार पडला.

नगर – पिंपळगाव पिसा (ता. श्रीगोंदा) येथील रेणुका देवी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील २००८–०९ च्या बारावीच्या विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा नुकताच उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. या मेळाव्याचे अध्यक्षस्थान विद्यालयाचे प्राचार्य बाळासाहेब मुठे यांनी भूषविले. तब्बल १६ वर्षांनंतर पुन्हा एकत्र आलेल्या माजी विद्यार्थ्यांनी शालेय आठवणींना उजाळा देत जुन्या दिवसांचे स्मरण केले. शाळेच्या वर्गखोल्या, मैदान, शिक्षक आणि मित्रांसोबतचे क्षण आठवताना अनेकांच्या डोळ्यांत जुन्या आठवणींचे अश्रू तरळले. हास्यविनोद, गप्पा आणि एकमेकांची मनमोकळी चौकशी करत सर्व जण पुन्हा जणू शाळेच्या दिवसात परतले होते.

कार्यक्रमात विविध सांस्कृतिक सादरीकरणे, खेळ आणि अनुभव कथन सत्र घेण्यात आले. काहींनी शिक्षणानंतरच्या त्यांच्या प्रवासाबद्दल सांगत पुढच्या पिढ्यांसाठी प्रेरणादायी अनुभव शेअर केले. शाळेच्या पाया घट्ट असल्यानेच आम्ही जीवनात स्थिर उभे आहोत, अशी भावना माजी विद्यार्थ्यांनी व्यक्त केली.

या प्रसंगी विद्यालयाचे प्राचार्य बाळासाहेब मुठे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की, विद्यार्थी फक्त विद्येनेच नव्हे तर कर्तृत्वाने पुढे जायला हवा. एवढ्या वर्षांनी विद्यार्थ्यांना पुन्हा भेटून मन आनंदित झाले. शाळा ही आपली आई आहे, म्हणून तिला विसरू नका; पुन्हा पुन्हा या, आणि तुमचे असेच स्नेहाचे नाते शाळेशी कायम राहो, असे आवाहन त्यांनी केले.

तसेच माजी विद्यार्थी व उद्योजक गोरख भालके यांनी प्रेरणादायी विचार मांडताना सांगितले की, जीवनात यशस्वी व्हायचे असेल तर निर्व्यसनी राहून स्वतःचे करिअर घडविणे गरजेचे आहे. जिद्द आणि चिकाटी जवळ असली की कोणतेही अडथळे सहज हाताळता येतात. आम्ही एकत्र घालवलेले दिवस अविस्मरणीय आहेत; त्या आठवणी आजही प्रेरणा देतात, असे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमानंतर सर्वांनी भोजनाचा आस्वाद घेतला आणि पुढील वर्षी आणखी मोठ्या प्रमाणावर भेटीचे आयोजन करण्याचा निर्धार व्यक्त केला. तसेच शाळेच्या विकासासाठी काही माजी विद्यार्थ्यांनी एकत्रित निधी जमा करून देणगी दिली. त्यांचे हे पाऊल इतरांसाठी प्रेरणादायी ठरले.

या प्रसंगी प्रा. अर्जुन इथाटे, प्रा. शहाजी गोरे, प्रा. प्रसाद शिंदे आदी शिक्षक उपस्थित होते. तसेच माजी विद्यार्थी गोरख भालके, सुयश भोसले, नवनाथ फंड, राहुल शिंदे, मच्छिंद्र इथापे, युवराज पठारे, बाळासाहेब जाधव, राजेंद्र सपाटे, आदिनाथ आढाव, पोपट शिंदे, उद्धव इथापे, महेंद्र थिटे, रवींद्र शिंदे, शंकर जठार, राहुल खामकर, नवनाथ पवार, सचिन थिटे, अनिल अवचिते, शारदा टकले, सोनाली पंदरकर, प्रियंका काळे, दीपिका गुंडेकर, सोनाली लोंढे, शीतल साबळे, आशा पंदरकर आदींची उपस्थिती लाभली.

प्रास्ताविक नितीन शेलार यांनी तर सूत्रसंचालन राहुल मांगडे यांनी केले. शारदा टकले यांनी आभार मानले. या स्नेहमेळाव्याने माजी विद्यार्थ्यांच्या मनात पुन्हा एकदा शालेय दिवसांची गोड आठवण जागवली आणि एकत्रतेचा आनंद साजरा करण्याची संधी दिली.

# कचरावेचक महिलांना दिवाळीनिमित्त साडी-फराळचे वाटप

## ज्ञानरचना सोशल फाउंडेशनचा उपक्रम; वंचितांची दिवाळी केली गोड



ज्ञानरचना सोशल फाउंडेशन (कल्याण–ठाणे) क्षेत्रीय कार्यालय अहिल्यानगर यांच्या वतीने वंचितांची दिवाळी साजरी करण्यात आली.

नगर – ज्ञानरचना सोशल फाउंडेशन (कल्याण–ठाणे) क्षेत्रीय कार्यालय अहिल्यानगर यांच्या वतीने वंचितांची दिवाळी साजरी करण्यात आली. शहर व उपनगरात काच, कागद व भंगार गोळा करून उदनिर्वाह करणाऱ्या महिलांना साडी–चोळी आणि दिवाळी फराळ भेट देण्यात आले. समाजातील शेवटच्या घटकांपर्यंत दिवाळीचा आनंद पोहोचवण्याच्या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला.

भिंगार येथील इंदिरानगर येथे वास्तव्यास असलेल्या कचरावेचक महिलांना संस्थेच्या वतीने सन्मानपूर्वक साडी–चोळी व फराळाचे वाटप करण्यात आले. हा उपक्रम ज्ञानरचना सोशल फाउंडेशनच्या संचालिका सुप्रिया चौधरी, संचालक प्रविण साळवे आणि भिंगार येथील भारत ठोकळ यांच्या हस्ते पार पडला. या प्रसंगी परिसरातील महिलांच्या चेहऱ्यावर समाधान व आनंद फुलला होता.

दिवाळीचा सण हा आनंद, प्रकाश आणि एकोपा यांचा प्रतीक मानला जातो. पण समाजातील काही घटक हा सण प्रत्येक वर्षी केवळ इतरांच्या घरातच बघत असतात. अशा वंचित घटकांपर्यंत दिवाळीचा आनंद पोहोचविण्याचा उद्देश ठेवून फाउंडेशनने माणुसकीची दिवाळी साजरी केली.

सुप्रिया चौधरी म्हणाल्या की, दरवर्षीप्रमाणे आम्ही या महिलांपर्यंत दिवाळीचा आनंद पोहोचवतो. त्यांच्या डोळ्यातील आनंदाश्रू आणि चेहऱ्यावरचा हसू हेच आमच्यासाठी सर्वात मोठं समाधान आहे. खरी दिवाळी केवळ घरातल्या दिव्यांनी नाही, तर दुसऱ्यांच्या आयुष्यात प्रकाश आणल्याने उजळते. समाजातील शेवटच्या व्यक्तीच्या घरात प्रकाश पसरवणे हीच खरी दिवाळी असल्याचे ते म्हणाल्या.

प्रविण साळवे म्हणाले, आपण सर्वांनी आपल्या क्षमतेनुसार समाजासाठी काहीतरी केलं पाहिजे. छोट्याशा प्रयत्नातून, एका छोट्या योगदानातून, कुणाचं आयुष्य उजळू शकतं. वंचितांची दिवाळी म्हणजे माणुसकीचा प्रकाश. समाजातील प्रत्येक व्यक्तीने आपल्या आजूबाजूच्या वंचित घटकांकडे हात पुढे करावा. आपल्यामुळे कुणाच्या आयुष्यात एक दिवा पेटला, हीच दिवाळीची खरी गोडी असल्याचे त्यांनी सांगितले.

# पद्मशाली विद्या प्रसारक मंडळाचे श्री मार्कंडेय विद्यालयात आकाश कंदील बनवा व पणती रंगवा कार्यशाळा उत्साहात



पद्मशाली विद्या प्रसारक मंडळाचे श्री मार्कंडेय विद्यालयात आकाश कंदील बनवा व पणती रंगवा कार्यशाळा उत्साहात पार पडली.

नगर – पद्मशाली विद्या प्रसारक मंडळाचे श्री मार्कंडेय विद्यालय गांधी मैदान, येथे इयत्ता पाचवी ते दहावीच्या मुलांसाठी आकाश कंदील बनवा आणि पणती रंगवा कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. या कार्यशाळेमध्ये प्रशालेच्या कला अध्यापिका सौ. गुडेवार मॅडम आणि सौ. कराळे मॅडम आणि सय्यद मोईन यांनी मुलांना आकाश कंदील कसे बनवायचे आणि पणती कशी रंगवायची याचे प्रात्यक्षिक करून दाखवले.

मुलांनी त्यांच्या कल्पकतेचा वापर करून अतिशय सुंदर असे निरनिराळे आकाश कंदील तयार केले तसेच अगदी आकर्षक अशा पणत्या रंगवल्या.

यावेळी पद्मशाली विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष अशोकराव सब्बन, तसेच पद्मशाली विद्या प्रसारक मंडळाचे माजी अध्यक्ष, माजी प्राचार्य सिद्धम सर, प्रशालेचे प्राचार्य छिंदम सर, उपप्राचार्य गोणे सर, पर्यवेक्षक चन्ना सर, सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

# कृष्णाली फाउंडेशनतर्फे पूरग्रस्तांना मदत

नगर – जिल्ह्यात अतिवृष्टीने मोठ्या प्रमाणावर झालेल्या नुकसानीच्या पार्श्वभूमीवर कृष्णाली फाउंडेशनने पूरग्रस्तांसाठी मदतीचा हात पुढे केला आहे. दिवाळीनिमित्त संस्थेच्यावतीने एकूण १४५ पूरग्रस्त कुटुंबीयांना किराणा किटचे वाटप करण्यात आले.

कर्जत तालुक्यातील नागलवाडी, नागापूर, शितपूर, निंबोडी, तरडगाव, मलठण तसेच जामखेड तालुक्यातील फक्राबाद, धानोरा, वंजारवाडी, वसेवाडी, पिंपरखेड, घोडेगाव आणि राजूरी या गावांमध्ये घरांचे, जनावरांचे व पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. अशा कठीण परिस्थितीत गावकऱ्यांना आधार देण्यासाठी फाउंडेशनने पुढाकार घेऊन किराणा किटचे वाटप केले.

या मदत उपक्रमात अध्यक्ष प्रशांत पाटील शेळके, सचिव प्रियंका पाटील शेळके–बोबडे, सहसचिव शिवाजी उबाळे, जयेश कांबळे, युवा शास्त्रज्ञ व जैवविविधता संशोधक रणजित रावसाहेब राऊत यांची प्रमुख उपस्थिती होती.

प्रशांत पाटील शेळके म्हणाले की, पूरग्रस्त कुटुंबांना आधार देण्यासाठी छोटीशी मदत करण्याचा प्रयत्न केला आहे. भविष्यातही संकटाच्या काळात समाजासाठी फाऊंडेशनच्या माध्यमातून आम्ही सदैव तयार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

प्रियंका पाटील शेळके–बोबडे यांनी फाऊंडेशनच्या वतीने सामाजिक, शैक्षणिक आणि पर्यावरणपूरक उपक्रम सातत्याने सुरु आहे. फाउंडेशनच्या या सामाजिक कार्यात सर्वांनी सहभागी होण्याचे आवाहन त्यांनी केले.

या उपक्रमास गोरख चौधरी, भिका लकडे, खजिनदार अमर बोबडे, रत्ना जाधव, तुकाराम कामठे, उद्योजक संग्राम आंधळे, उपाध्यक्ष अमोल शिंदे यांसह अनेक सहकार्य लाभले. स्थानिक ग्रामस्थांनी या उपक्रमाबद्दल कृतज्ञता व्यक्त करत कृष्णाली फाउंडेशनचे आभार मानले. हा उपक्रम खासदार निलेश लंके यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात आला.




जिल्ह्यात अतिवृष्टीने मोठ्या प्रमाणावर झालेल्या नुकसानीच्या पार्श्वभूमीवर कृष्णाली फाउंडेशनने पूरग्रस्तांसाठी मदतीचा हात पुढे केला आहे. दिवाळीनिमित्त संस्थेच्यावतीने एकूण १४५ पूरग्रस्त कुटुंबीयांना किराणा किटचे वाटप करण्यात आले.




वडगाव गुप्ता येथील ब्ल्यू डायमंड अकॅडमीच्या विद्यार्थ्यांनी दीपावलीनिमित्त अपंग व गरजू, निराधार विद्यार्थ्यांच्या विद्यालयास नित्योपयोगी वस्तूंची भेट दिली.

# ब्लू डायमंड अकॅडमीच्या विद्यार्थ्यांची आनंदऋषीजी विद्यालयातील विद्यार्थ्यांना मदत

नगर – वडगाव गुप्ता येथील ब्ल्यू डायमंड अकॅडमीच्या विद्यार्थ्यांनी दीपावलीनिमित्त अपंग व गरजू, निराधार विद्यार्थ्यांच्या विद्यालयास नित्योपयोगी वस्तूंची भेट दिली. प्रत्येक वर्षीप्रमाणे याही वर्षी सामाजिक बांधिलकी जोपासली जावी, या हेतूने प्राचार्य सुजित डोंगरे व उपप्राचार्या सौ. शारदा शेळके यांनी उपक्रमाचे आयोजन केले.

नेप्ती येथील आनंदऋषीजी विद्यालयातील विद्यार्थ्यांना दिवाळी साजरी करता यावी, या हेतूने त्या विद्यार्थ्यांसाठी दिवाळी फराळ, मिठाई, तसेच नित्योपयोगी वस्तूंची नववी व दहावीच्या विद्यार्थ्यांच्या सहभागाने मदत केली व माणुसकीचे दर्शन घडवले. विद्यार्थ्यांनी केलेल्या मदतीमुळे तेथील विद्यार्थी आनंदी व प्रसन्न दिसत होते, या उपक्रमात सर्व शिक्षक आणि शिक्षिका यांचेही सहकार्य लाभले.

# सिद्धेश्वर तरुण मंडळ व गवळी समाजातर्फे सगर उत्सव उत्साहात



नगर – येथील जंगूभाई तालमीच्या सिद्धेश्वर तरुण मंडळ व गवळी समाजाच्या वतीने तोफखाना येथे सगर उत्सव उत्साहात झाला. उत्सवात नगर, भिंगार, सर्जेपुरा, तोफखाना, परशाखुंट, गवळीवाडा आदी ठिकाणचे गवळी समाज बांधव आपल्या म्हशी पशुधनास सह आले होते. यावेळी त्यांनी आपल्या म्हशींना सजवून आणले होते

सिद्धेश्वर तरुण मंडळाच्या वतीने यावेळी गवळी बांधवांचा टोपी, उपकरणे घालून गुलाल लावून व स्टीलची बादली भेट देण्यात आली. यावेळी राजूमामा जाधव, अॅड. धनंजय जाधव, अभिमन्यू जाधव आदींसह ज्येष्ठ समाज बांधव व गवळी समाज उपस्थित होता. हा उत्सव पाहण्यासाठी नगरकर उपस्थित होते.

संबोधी विद्यालय ते सिद्धीबाग कॉर्नर या ठिकाणी आलेल्या पशुपालकांनी आपली म्हशी पळवल्या. राज्यात ठिकठिकाणी दिपावलीचा सण मोठ्या उत्साहात साजरा होत आहे. त्यानंतर नगर शहरातील गवळी समाज रेड्यांची आणि म्हशींची सगर म्हणजेच मिरवणूक दरवर्षी उत्साहाने काढत असतात. सजवलेले रेडे आणि म्हशीची मिरवणूक काढून आगळा वेगळा सण साजरा केला जातो. असे म्हणतात कि म्हैस हे लक्ष्मीचे रूप आहे, तर रेडा हा यमाचे वाहन आहे. रेड्याची पूजा केल्याने नवीन वर्षात कुठल्याही अडचणी येत नाही. नगरमध्ये ३ ठिकाणी होणाऱ्या या सोहळ्यात रेड्यांना, म्हशींना सजवून त्याची मिरवणूक काढली जाते. ढोल तश्यांच्या गजरात रेड्यांचे मालक उत्साहात त्यांची मिरवणूक काढतात. गवळी समाजातर्फे रेड्यांची पूजा केली जाते. तोफखान्यात ही अनोखी प्रथा शहराच्या मध्यभागी ३५ वर्षपासून पाळली जात आहे. रंगवलेली शिंगे, गळ्यात घुंगरमाळा, पाठीवरती नक्षीकाम, मानेवर मोरपंखांचा पिसारा अशा रूपात नटलेल्या हेल्यांमुळे सगर महोत्सव लक्षवेधी ठरला.दरवर्षी दिवाळी पाडव्यानंतर या महोत्सवाचे आयोजन करण्यात येते.

# गरमागरम मूग डाळ टिक्की

झटपट रेसिपी

दोस्तांनो, शिक्षण किंवा नोकरीनिमित्ताने बाहेरगावी रहाताना घरच्या चवीची आठवण येत असते. रोजच्या धावपळीत झटपट होणारे तेच ते पदार्थ खावे लागतात. मात्र एखाद्या दिवशी निवांत वेळ असल्यावर तुमच्यातला शेफ जागा होतो. मग एखादी वेगळी रेसिपी ट्राय करता येते. अर्थात ही रेसिपी पौष्टिकही असायला हवी. म्हणूनच प्रथिनयुक्त डाळीपासून टिक्की बनवता येईल. यासाठी मूग डाळ वापरता येईल. चला तर मग मूग डाळीची टिक्की बनवू या.

**सामग्री:** एक वाटी मूग डाळ, आल्याचा छोटा तुकडा, दोन हिरव्या मिरच्या, चिरलेली/कोथिंबिर, एक चिरलेला कांदा आणि सिमला मिरची, प्रत्येकी एक चमचा जिरेपूड आणि धनेपूड, एक चमचा कॉर्नफ्लोर, अर्धा चमचा आमचूर, चाट मसाला, ५० ग्रॅम पनीर, मीठ आणि तेल.

**कृती:** एका भांड्यात पाणी गरम करायला ठेवा. त्यात मूग डाळ घालून उकळून घ्या. डाळीतलं पाणी काढून टाका. आता ही डाळ थंड पाण्याने धुवून बाजूला ठेवा. डाळ थंड झाल्यावर मिक्सरच्या भांड्यात डाळ, आलं, हिरवी मिरची आणि कोथिंबिर घालून वाटून घ्या. हे वाटण एका भांड्यात काढा. आता यात चिरलेला कांदा, सिमला मिरची, जिरेपूड, कॉर्नफ्लोर, आमचूर, चाट मसाला, कुस्करलेलं



पनीर आणि मीठ घाला. सर्व घटक नीट मिसळून घ्या. हाताला थोडं तेल लावा. मूग डाळीचं मिश्रण घ्या. त्याला टिक्कीप्रमाणे गोल आकार द्या. अशाप्रकारे सर्व टिक्की बनवून घ्या. गॅसवर तवा ठेवा. त्यावर तेल घाला. गरम झाल्यावर तव्यावर टिक्की ठेवा. दोन्ही बाजूंनी खरपूस भाजून घ्या. ही टिक्की सॉस किंवा चटणीसोबत खाता येईल.




# वाळवंटात प्रयत्ने फुलली फळबाग

अचिव्हर

राजस्थानमधील अलाई गावातील शेतकरी अशोक जांगू यांनी वाळवंटातील खाऱ्या पाण्याने भरलेल्या जमिनीत लागवड करून कृषी जगतात इतिहास रचला आहे. एके काळी गवतही न उगवणारी त्यांची भली मोठी जमीन आता लाल डाळिंब, सेंद्रिय अन्न उत्पादने आणि शुद्ध तुपाचा सुगंध घेऊन येते. त्यांच्या यशस्वी प्रयत्नांमुळे केवळ नागौरमधील नव्हे, तर राजस्थानमधील शेतकऱ्यांनाही प्रेरणा मिळाली आहे. त्यांनी दाखवून दिले आहे, की प्रबळ इच्छाशक्तीने नापीक जमीनदेखील सुपीक बनवता येते.

जांगू यांनी सुमारे सात वर्षांपूर्वी पारंपारिक शेती सोडून आधुनिक शंभर टक्के सेंद्रिय शेती स्वीकारली. सुरुवातीला त्यांनी समाजापासून अंतर राखले आणि आपली सर्व ऊर्जा शेतीसाठी समर्पित केली. आज त्यांचे प्रयत्न एका मोठ्या नेटवर्कमध्ये बदलले आहेत. ते आता पाचशेहून अधिक शेतकऱ्यांसोबत देश आणि परदेशात सेंद्रिय उत्पादने निर्यात करण्यासाठी सहकार्य करतात. त्यांच्या फार्म हाऊसमध्ये एक मिनी फूड पार्क आहे. तिथे तूप, डाळी, तेल, गहू आणि जिरे यासारखी उत्पादने उच्च दर्जाच्या पॅकेजिंगसह तयार केली जातात. हे मिनी फूड पार्क लागवडीपासून विक्रीपर्यंतची संपूर्ण प्रक्रिया नियंत्रित करते. जांगू यांची सेंद्रिय उत्पादने गुणवत्ता आणि शुद्धतेसाठी सर्वाधिक ओळखली जातात. म्हणूनच बाजारात त्यांची मागणी सतत वाढत आहे. त्यांचे देशी गायीचे तूप ३,२०० रुपये प्रति किलो या भावाने विकले जाते, तरीही त्याची मागणी जास्त आहे. त्यांची इतर सेंद्रिय उत्पादने देखील बाजारभावापेक्षा दुप्पट, तिप्पट महाग आहेत; परंतु शुद्धता आणि उच्च गुणवत्तेमुळे त्यांना लाभणाऱ्या ग्राहकांची संख्या सातत्याने वाढत आहे.

जांगू यांनी हे सिद्ध केले आहे, की उत्पादने शुद्ध असल्यास शेतकऱ्यांना आंतरराष्ट्रीय बाजारात उत्तम किंमत मिळू शकते. वाळवंटातील मातीच्या आव्हानांना




न जुमानता त्यांनी ५५ एकर जमिनीवर डाळिंबाची सुमारे सहा हजार झाडे लावली आहेत. तीव्र पाण्याच्या कमतरतेचा सामना करत, त्यांनी एक दूरदर्शी पाऊल उचलले. त्यांनी आपल्या शेतावर एक कोटी लिटर क्षमतेचा तलाव बांधला. पावसाचे पाणी साठवण्यासाठी आणि पिकांना सिंचन करण्यासाठी तो वापरला जाऊ शकतो. या प्रभावी पाणी व्यवस्थापनामुळे त्यांना वाळवंटात फळझाडे लावण्यास मदत झाली. त्यांचे जलसंधारणाचे प्रयत्न जवळच्या शेतकऱ्यांसाठी एक प्रशिक्षण केंद्र बनले आहे.

जांगू यांच्या अथक प्रयत्नांना आणि यशाला राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर मान्यता मिळाली आहे. २०१९ मध्ये राजस्थान सरकारने त्यांना प्रोग्रेसिव्ह फार्मर पुरस्कार आणि एक लाख रुपयांचे रोख पारितोषिक दिले. त्याच वर्षी, एका प्रतिष्ठित अमेरिकन कंपनीने त्यांना भारतातील टॉप दहा शेतकऱ्यांपैकी एक म्हणून घोषित केले. जांगू यांची कहाणी सिद्ध करते, की दृढनिश्चय, सेंद्रिय शेती आणि नावीन्यपूर्ण तंत्रज्ञानाने वाळवंटदेखील सुपीक जमिनीत रूपांतरित केले जाऊ शकते आणि शेतकरी स्वावलंबनाचा एक नवीन अध्याय लिहू शकतात.

# रोजगाराचा चांगला पर्याय इव्हेंट मॅनेजमेंट

करीअरवाटा

'इव्हेंट मॅनेजमेंट' म्हणजे फक्त रंगतदार कार्यक्रमांचे आयोजन नाही, तर त्यामागे असते शिस्तबद्ध नियोजन, वेळेचे व्यवस्थापन आणि कल्पक विचार. या क्षेत्रात यशस्वी व्हायचे असल्यास काही खास कौशल्य आत्मसात करणे आवश्यक आहे.



**संवादकौशल्य**

इव्हेंट मॅनेजमेंटच्या क्षेत्रामध्ये विविध लोकांशी संपर्क ठेवणे गरजेचे असते. चांगले संवादकौशल्य असल्याने अनेक कामे सोपी होतात.

**संघटनकौशल्य**

इव्हेंट मॅनेजमेंटमध्ये अनेक तपशिलांचे नियोजन करावे लागते.

चांगले संघटनकौशल्य असल्याने सर्व कामे वेळेत आणि सुव्यवस्थितपणे पूर्ण करता येतात.

**समस्या सोडवण्याची क्षमता**

कोणत्याही इव्हेंटमध्ये अडचणी येऊ शकतात. अशा वेळी धैर्याने आणि हुशारीने समस्या सोडवण्याची क्षमता महत्त्वाची ठरते.

**तणाव नियोजन**

या क्षेत्रात कामाचा ताण जास्त असू शकतो. तणावाखाली शांत राहून काम करण्याची क्षमता यशाची गुरुकिल्ली आहे.

**मल्टिटास्किंगची कला**

एकाच वेळी अनेक कामांवर लक्ष ठेवणे आणि ती योग्य प्रकारे पार पाडणे, हे या क्षेत्रातील महत्त्वाचे कौशल्य आहे.

**लवचिकता**

परिस्थितीनुसार बदल करण्याची तयारी आणि क्षमता इव्हेंट मॅनेजरमध्ये असणे आवश्यक आहे.

**नेटवर्किंग कौशल्य**

लोकांशी चांगला संपर्क राखून असणे या व्यवसायात खूप महत्त्वाचे ठरते. चांगले नेटवर्किंग कौशल्य करिअरमध्ये पुढे जाण्यास मदत करते.

# बना पेट्रोलियम इंजिनिअर

वेगळ्या वाटा

जगभरातच पेट्रोल, डिझेलचा वापर मोठ्या प्रमाणावर होतो. ऊर्जेचे हे स्रोत मर्यादित प्रमाणात आहेत. त्यामुळे त्यांचा वापरही प्रमाणातच व्हायला हवा. इंधनाच्या साठ्यांचा शोध सतत सुरू असतो.



सध्याच्या काळात इंधनाची ने-आण करण्यासाठी पाईपलाईनचा वापर होऊ लागला आहे. भविष्यातही इंधनाची गरज अजून वाढणार आहे. म्हणूनच या क्षेत्रातल्या तज्ज्ञांची म्हणजेच इंजिनिअर्सची गरज वाढते आहे. पेट्रोलियम इंजिनिअर्सना सध्या बरीच मागणी आहे. इंजिनिअरींगकडे वळणारे विद्यार्थी या शाखेचा विचार करू शकतात. बारावीनंतर पेट्रोलियम इंजिनिअरींगला प्रवेश घेता येईल. तुम्ही पेट्रोलियम इंजिनिअरींग, पेट्रोकेमिकल इंजिनिअरींग, अप्लाइड पेट्रोलियम इंजिनिअरींग, पेट्रोकेमिकल इंजिनिअरींग, पेट्रोलियम एक्सप्लोरेशन इंजिनिअरींग, पेट्रोलियम रिफायनरी इंजिनिअरींग अशा विषयांमध्ये बीई करता येईल. देशभरातल्या सरकारी कंपन्यांमध्ये तुम्हाला संधी मिळू शकते. शिवाय खाजगी कंपन्याही संधी देतात. हिंदुस्तान पेट्रोलियम, ऑईल इंडिया, हिंदुस्तान ऑईल एक्सप्लोरेशन कंपनी अशा विविध कंपन्यांमध्ये नोकरी करता येईल.

# फॅशनच्या दुनियेत करा करिअर

स्टाईल स्टेटमेंट


फॅशनच्या दुनियेत करिअर करायचं असेल तर योग्य कॉलेज आणि कोर्स निवडणे खूप गरजेचे आहे. ग्लॅमर, क्रिएटिव्हिटीसोबतच या क्षेत्रात उत्तम संधी आहेत, जिथे डिग्री मिळताच उत्तम प्लेसमेंटची शक्यता असते. या क्षेत्रात रुची असणाऱ्या तरुणांना त्यांची स्वप्ने प्रत्यक्षात आणण्यासाठी आवश्यक ती माहिती मिळू शकेल. फॅशन करिअरमध्ये यश मिळवण्यासाठी केवळ कौशल्यच नव्हे, तर योग्य शैक्षणिक आधारही आवश्यक असतो. शीर्ष फॅशन महाविद्यालये केवळ आपल्या सर्जनशील कल्पनाच वाढवत नाहीत तर आपल्याला व्यावहारिक ज्ञान आणि उद्योग एक्सपोजरदेखील देतात. यामुळेच या कॉलेजांमधून पदवी मिळविणाऱ्या उमेदवारांना नोकरीच्या उत्तम संधी मिळतात.

**नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ फॅशन टेक्नॉलॉजी (निफ्ट)**

'नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ फॅशन टेक्नॉलॉजी' (निफ्ट) ही भारतातील फॅशन शिक्षण क्षेत्रातील सर्वात प्रतिष्ठेची संस्था आहे. त्याचे देशभरात १८ कॅम्पस असून येथे बॅचलर ऑफ डिझाइन (बी.डी.एस.), मास्टर ऑफ डिझाइन (एम.डी.एस.) आणि फॅशन मॅनेजमेंटसारखे अभ्यासक्रम चालवले जातात. या कॉलेजची फी वर्षाला सुमारे तीन ते सहा लाख रुपये असून, निफ्ट प्रवेश परीक्षेच्या आधारे प्रवेश दिला जातो.

**ॲमिटी स्कूल ऑफ फॅशन टेक्नॉलॉजी**

'एमिटी स्कूल ऑफ फॅशन टेक्नॉलॉजी' हा एमिटी विद्यापीठाचा एक भाग आहे, जिथे 'फॅशन डिझाइन' आणि 'फॅशन टेक्नॉलॉजी'चे अभ्यासक्रम दिले जातात. येथे विद्यार्थ्यांना थिअरी आणि प्रॅक्टिकल या दोन्ही विषयांत




प्राविण्य दिले जाते. या संस्थेची फी वर्षाला सुमारे तीन ते सहा लाख रुपये असून निवड प्रक्रियेत गुणवत्ता व मुलाखतीचा समावेश आहे.

**पर्ल ॲकॅडमी**

पर्ल ॲकॅडमी ही एक अग्रगण्य खासगी फॅशन संस्था आहे. जिथे फॅशन डिझाइन, कम्युनिकेशन डिझाइन आणि स्टायलिंग सारखे अभ्यासक्रम दिले जातात. इथे इंडस्ट्री एक्सपोजर आणि एक्स्पर्ट ट्रेनरच्या मदतीने विद्यार्थ्यांना प्रॅक्टिकल नॉलेज मिळते. दर वर्षी सुमारे चार ते आठ लाख रुपये शुल्क असणाऱ्या या अभ्यासक्रमासाठी प्रवेश परीक्षा आणि मुलाखतीच्या माध्यमातून प्रवेश दिला जातो. या टॉप कॉलेजांमध्ये फॅशनशी संबंधित अभ्यासक्रमांचा कालावधी तीन-चार वर्षे (अंडरग्रॅज्युएट) आणि दोन वर्ष (पदव्युत्तर) असतो. कॉलेजनुसार फीची रेंज वेगवेगळी असते; पण अभ्यासात केलेली ही गुंतवणूक तुमच्या करिअरचा भक्कम पाया रचण्यास मदत करते. पदवी पूर्ण होताच मोठमोठ्या ब्रँडमध्ये काम करण्याची संधी मिळते.

कॉलेजांमध्ये प्रवेश प्रक्रिया ऑनलाइन पद्धतीने केली जाते. त्यात प्रवेश परीक्षेच्या आधारे प्रवेश मिळतो. योग्य कागदपत्रांसह वेळेवर अर्ज केल्यास तुमच्या यशात मदत होईल. तुम्ही संस्थांच्या अधिकृत संकेतस्थळावर सविस्तर माहिती, अर्ज फॉर्म आणि शुल्क रचनेशी संबंधित तपशील उपलब्ध आहेत.

## शेर की जुबानी

| | | |
|---|---|---|
| जिंदगी गुजर जाए पर दोस्ती कम न हो, याद हमें रखना चाहे पास हम न हो। | तारों में अकेला चांद जगमगाता है,मुश्कीलों में अकेला इन्सान डगमगाता है, कांटो से मत घबराना मेरे दोस्त, क्योंकी काटों में भी गुलाब मुस्कुराता है। | कभी रात में तारे गिनके देख लेना, जितना तुम गिन पाए उतना तुम हमें यात करते हो, और जितने तारे बच जाए उतना हम तुमको याद करते हैं। |

ॲप वर्ल्ड

## झकास नेव्हिगेशन ॲप: मॅपल्स

भारतात 'डिजिटल मॅप'चे एक नवे पर्व सुरू झाले आहे. 'मॅप माय इंडिया'ने विकसित केलेले 'मॅपल्स' हे नवे 'नेव्हिगेशन ॲप' सध्या सर्वांचे लक्ष वेधत आहे. 'मॅपल्स' हे १९९५ मध्ये स्थापन झालेल्या 'मॅप माय इंडिया' कंपनीने विकसित केलेले ॲप आहे. जवळपास तीन दशकांच्या अनुभवावर आधारित हे ॲप भारतातील स्थानिक गरजा लक्षात घेऊन बनवले आहे. यात 'थ्रीडी व्ह्यू', थेट वाहतूक सिग्नल पाहणे, स्पीड आणि सिक्युरिटी अलर्ट, टोल खर्चाचा अंदाज आणि रिअल टाइम मार्ग दाखवणे यांसारखे फीचर्स आहेत. विशेष म्हणजे 'मॅपल्स पिन' आणि 'डिजीपिन' ही 'डिजिटल ॲड्रेस'ची प्रणाली भारताला ३.८ मीटर चौरस विभागांमध्ये विभागते. त्यामुळे दुर्गम आणि ग्रामीण भागातील पत्त्याचाही अचूक शोध घेता येतो.

यामध्ये सगळ्यात जास्त आकर्षित करणारे फीचर म्हणजे स्पीड कॅमेरा. हायवेवर 'सिक्रेट स्पीड कॅमेरा' कुठे आहे हे या फीचरमुळे कळणार आहे. याशिवाय बहुमजली इमारतींमधील दुकाने किंवा कार्यालये शोधण्यासाठी 'इनडोअर नेव्हिगेशन' सुविधाही उपलब्ध आहे. 'मॅपल्स'चे आणखी एक फीचर म्हणजे त्याची गोपनीयता. यातील सर्व डेटा भारतातच संग्रहित केला जातो.

टेक टिप्स




## व्हॉट्स ॲपद्वारे करा स्क्रीन शेअर

तुमचा स्क्रीन ओळखीच्या व्यक्तीसोबत शेअर करायचा असेल, तर 'एनी डेस्क' किंवा 'गुगल मीट' सारख्या ॲप्सची आवश्यकता आता राहिलेली नाही. तुम्ही तुमचा स्क्रीन व्हॉट्स ॲपद्वारेही शेअर करू शकता. 'मेटा'च्या मालकीचे हे ॲप बऱ्याच काळापासून हे फीचर देत आहे. व्हॉट्स ॲपद्वारे स्क्रीन शेअर करून तुम्ही तुमच्या मोबाइल किंवा लॅपटॉपवरून इतरांना प्रेझेंटेशन आणि कंटेंट दाखवू शकता. व्हॉटस् ॲपद्वारे तुमचा स्क्रीन कसा शेअर करायचा ते जाणून घेऊ या. प्रथम, तुम्हाला व्हिडीओ कॉल करावा लागेल. त्यानंतर व्हिडीओ कंट्रोल सेक्शनमधील तीन ठिपक्यांवर टॅप करा. तुम्हाला स्क्रीन शेअर पर्याय दिसेल. यावर टॅप केल्याने तुम्हाला तुम्ही व्हॉट्स ॲपवर रेकॉर्डिंग करत आहात हे सूचित करण्यास सांगितले जाईल. नंतर, तुम्हाला ॲप किंवा संपूर्ण स्क्रीन शेअर करण्याचा पर्याय दिला जाईल. तुमचे काम पूर्ण झाल्यावर, तुम्ही स्टॉप शेअरिंग बटणावर टॅप करून स्क्रीन शेअरिंग थांबवू शकता. व्हॉट्स ॲपवरील स्क्रीन शेअरिंग फीचर खूप उपयुक्त आहे; परंतु सायबर गुन्हेगार त्याचा गैरवापर करत आहेत. ते या वैशिष्ट्याचा वापर करून लोकांना जाळ्यात अडकवतात. ते बँक किंवा सरकारी अधिकारी असल्याचे भासवून व्हिडीओ कॉल करतात. लोकांना संभाषणात गुंतवतात आणि स्क्रीन शेअर करण्यास सांगतात. एखादी व्यक्ती स्क्रीन शेअर करते, तेव्हा स्कॅमर बँक तपशील, ओटीपी आणि वैयक्तिक संदेशांमध्ये प्रवेश करतात.

टेक स्टोरी





## 'ॲपल'कडून 'एआय जनरेटिव्ह'चा वापर

कृत्रिम बुद्धिमत्तेसाठी स्पर्धा सतत तीव्र होत आहे. 'ओपन एआय'च्या जनरेटिव्ह एआय, चॅटजीपीटी नंतर इतर मोठ्या कंपन्यादेखील 'एआय' शर्यतीत मागे न राहण्याचा निर्धार करत आहेत. गुगल आणि मायक्रोसॉफ्टसारख्या टेक दिग्गजांच्या पाठोपाठ जगातील सर्वात मोठी सूचीबद्ध कंपनी 'ॲपल' आता 'एआय' शर्यतीत सामील झाली आहे. अहवालांवरून असे दिसून येते, की 'आयफोन' आणि 'आयपॅड' सारख्या अनेक उत्कृष्ट उत्पादनांची विक्री करणाऱ्या 'ॲपल'ने आता चॅटजीपीटी प्रमाणेच स्वतःचे 'जनरेटिव्ह एआय' विकसित केले आहे. अहवालांनुसार, 'ॲपल'ने आधीच 'चॅटजीपीटी'सारखी अंतर्गत सेवा विकसित केली आहे. तिचा वापर करून कर्मचारी नवीन वैशिष्ट्यांची चाचणी घेत आहेत, मजकूर सारांशित करत आहेत आणि शिकलेल्या डेटाच्या आधारे प्रश्नांची उत्तरे देत आहेत. 'ॲपल'ने 'जनरेटिव्ह एआय' विकसित केल्याच्या बातम्यांनी मथळे बनवण्याची ही पहिलीच वेळ नाही. या वर्षाच्या सुरुवातीला जुलैमध्ये असेच अहवाल समोर आले होते. त्यानंतर 'ॲपल' स्वतःच्या 'एआय मॉडेल'वर काम करत असल्याचे वृत्त आले होते. अहवालांनुसार, 'ॲपल'चे 'लार्ज लँग्वेज मॉडेल (एलएलएम) 'अजॅक्स' नावाच्या नवीन फ्रेमवर्कवर बांधले आहे. 'ॲपल'ने ही पद्धत शोधून काढली.

# सुंदर आणि रम्य मोल्लेम

भटकंती

गोव्यापासून काही किलोमीटर अंतरावर मोल्लेम नावाचं गाव आहे. कर्नाटक सीमेजवळचं हे गाव खूप सुंदर आहे. इथे एक अभयारण्य आहे. हे अभयारण्य पाहण्यासाठी लोक मोठ्या संख्येने इथे येतात. मोल्लेम गावात तुम्ही निवांत क्षण घालवू शकता. या परिसरात प्राचीन खडक पहायला मिळतात. हे खडक ३६०० अब्ज वर्षांपूर्वीचे असल्याचं म्हटलं जातं. इथल्या तांबडी सुरला परिसरात शंकराचं पुरातन मंदिर आहे. हे स्थान गोव्यातल्या कदंबा राजवटीचं प्रतीक मानलं जातं. मोल्लेमचं निसर्गसौंदर्य आपल्या नजरेत भरतं. दोन दिवसांच्या छोट्या ट्रिपसाठी हे स्थान अगदी योग्य आहे. इथे खूप धमाल करता येतो. वीकेंडला कुठे जायचं हा



प्रश्न पडला असेल तर मोल्लेमची निवड करता येईल. या ठिकाणी कोकण रेल्वेने जाता येईल. मडगाव रेल्वे स्थानकावरून मोल्लेम ५० किलोमीटर अंतरावर आहे. स्वत:च्या वाहनानेही या ठिकाणी जाता येईल. या प्रवासादरम्यान सुंदर निसर्ग अनुभवता येईल. तरुणाई नेहमीच हटके ठिकाणांच्या शोधात असते. अशा कलंदरांसाठी मोल्लेम हे ठिकाण योग्य ठरेल.

# पांढऱ्या केसांवर घरगुती उपाय

स्टाईल ॲंड ट्रेंड्स

लांब, जाड, काळे आणि सुंदर केस कोणाला आवडत नाहीत. केस गळणे आणि कोरडेपणा याशिवाय, आजकाल तरुणांना तोंड द्यावे लागणारी आणखी एक समस्या म्हणजे अकाली पांढरे होणे. वाढते प्रदूषण, आहाराच्या सवयी आणि ताण ही त्याची मुख्य कारणे आहेत. केस पांढरे होण्याचे सामान्य वय म्हणजे वृद्धापकाळ. केस तात्काळ काळे करण्यासाठी बाजारात अनेक उत्पादने उपलब्ध असली तरी, ती अत्यंत हानिकारक आहेत. केस पांढरे होणे ही अनेक लोकांसाठी अनुवांशिक समस्या असली, तरी ती तरुण वयातच सामान्य होत चालली आहे. काही गोष्टी लक्षात ठेवून आणि घरगुती उपाय वापरून, तुम्ही या समस्येवर सहज मात करू शकता.

आवळा केसांसाठी अत्यंत फायदेशीर आणि आवश्यक आहे. म्हणूनच तुम्हाला ते तेल आणि शाम्पूसारख्या बहुतेक



केसांच्या उत्पादनांमध्ये सहज आढळते. तुमचे केस काळे ठेवण्यासाठी, तुम्ही घरी ताजे आवळा तेलदेखील बनवू शकता. हे करण्यासाठी, आवळ्याचे काही तुकडे नारळाच्या तेलात घाला आणि ते उकळू द्या. ते काळे होईपर्यंत उकळवा. तुकडे पिळून घ्या आणि तेल वेगळे करा. झोपण्यापूर्वी दररोज तुमच्या केसांच्या मुळांना हे तेल लावा.

मेथीचे दाणे निरोगी पचनक्रिया वाढवतात; परंतु काही लोकांना माहीत आहे, की मेथी राखाडी केस काळे करण्यासाठीदेखील प्रभावी आहे. काही मेथीचे दाणे रात्रभर पाण्यात भिजवा. सकाळी भिजवलेल्या पाण्याने ते बारीक करा आणि पेस्ट बनवा. ही पेस्ट तुमच्या डोक्याला लावा.

**आवळा रस आणि बदाम तेल**

बदाम तेलात व्हिटॅमिन ई असते. ते केस निरोगी ठेवण्यात महत्त्वाची भूमिका बजावणारे आणखी एक पोषक तत्व आहे. ते अकाली पांढरे होणे कमी करण्यास मदत करते. बदाम तेल आणि आवळ्याचा रस समान प्रमाणात मिसळा. सर्वोत्तम परिणामांसाठी या मिश्रणाने डोक्याचे मालिश करा.

**तीळ**

तीळ नेहमीच फायदेशीर मानले गेले आहे. तीळ तेल तुमचे केस जाड आणि काळे करण्यास मदत करते. हे करण्यासाठी, तीळ तेल बदाम तेलात मिसळा आणि ते लावा. सुमारे अर्ध्या तासाने पाण्याने धुवा. काही दिवसांत तुम्हाला जाड, काळे केस दिसतील.

# आला एथनिक्सचा हंगाम

सणासुदीचे दिवस आणि त्यानंतर येणारी लग्नसराई यासाठी तुम्ही तयारीत रहायला हवं. बाजारात एथनिक्सची बरीच व्हरायटी पहायला मिळते. तुम्हीही तुमच्या एथनिक्सना वेगळा टच देऊ शकता.

* पांढऱ्या रंगाची नेहमीच चलती असते. यंदाही या रंगाची जादू कायम असेल. शॉर्ट कुर्त्यापासून लॉंग कुर्त्यापर्यंत पांढऱ्या रंगात तुम्ही बरंच काही ट्राय करू शकता. पांढऱ्यावर पांढरं नेहमीच चांगलं दिसतं. मात्र व्हाईट कुर्त्यावर क्रीम पँट असंही कॉम्बिनेशन करता येईल. एखादा स्टोल घेऊन लूकला वेगळा ट्विस्ट देता येईल.

* मुलांची फॅशन बरीच बदलली आहे. टिपिकल कुर्त्यासोबतच वैविध्यपूर्ण पॅटर्नचे कुर्ते बाजारात पहायला मिळतात. कुर्ता विथ जॉगर्स ही फॅशनही कॅरी करता येईल.



ग्रूमिंग

* शॉर्ट कुर्ता हा प्रकारही ट्रेंडमध्ये आहे. विविध रंगाचे, फॅशनचे आणि प्रिंट्सचे कुर्ते बाजारात पहायला मिळतात. तुम्ही तुमच्या आवडीनुसार शॉर्ट कुर्ता निवडू शकता.

* तुमच्या अगदी साध्याशा लूकला ट्विस्ट देण्यासाठी नेहरू जॅकेट कॅरी करता येईल. स्लीव्हलेससह पूर्ण बाह्यांची जॅकेटही छान दिसतात.

* नेहमीचे कुर्तेही इन आहेत. या कुर्त्यांमध्ये छानशा प्रिंट्स पहायला मिळतात.

# जिल्ह्यातील १२८ विशेष शिक्षकांना तीन महिन्यांपासून वेतन नाही, विशेष शिक्षकांनी घेतली शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांची भेट

**उमेश शिंदे यांनी मांडली विशेष शिक्षकांची व्यथा; शिक्षण मंत्र्यांचे कार्यवाहीचे निर्देश**



शिक्षकांच्या वेतनासंदर्भातील समस्येकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी विशेष शिक्षक उमेश शिंदे यांनी शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांची त्यांच्या निवासस्थानी भेट घेऊन या प्रश्नावर लक्ष वेधले.

नगर – जिल्ह्यातील १२८ विशेष शिक्षकांना गेले तीन महिन्यांपासून वेतन मिळालेले नाही, आणि त्यामुळे सदर शिक्षकांच्या कुटुंबांची दिवाळी अंधारात गेली आहे. शिक्षकांच्या या गंभीर समस्येकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी विशेष शिक्षक उमेश शिंदे यांनी थेट शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांची त्यांच्या निवासस्थानी भेट घेऊन या प्रश्नावर लक्ष वेधले.

यावेळी शिंदे यांनी अहिल्यानगर जिल्ह्यातील विशेष शिक्षकांची व्यथा, त्यांना भेडसावणाऱ्या आर्थिक अडचणी, तसेच शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांच्या ढिसाळ नियोजनामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीची माहिती शिक्षण मंत्री भुसे यांना दिली. या चर्चेदरम्यान मंत्री दादाजी भुसे यांनी परिस्थिती गांभीर्याने दखल घेत तत्काळ कार्यवाहीचे निर्देश दिले. मंत्री भुसे म्हणाले की, शासकीय नोकरी ही राष्ट्रसेवेची संधी आहे. शिक्षक हे समाजाच्या घडणीतील सर्वात महत्त्वाचे घटक आहेत. त्यांच्या हक्काच्या वेतनात विलंब होणे ही अत्यंत खेदजनक बाब आहे. जबाबदार अधिकाऱ्यांनी तातडीने नियोजन करून शिक्षकांना न्याय द्यावा. त्यांनी शिक्षण सचिवांना त्वरित निर्देश देऊन पुढील कारवाईचे आदेश दिले, तसेच शिक्षकांना प्रोत्साहन व प्रेरणा देणे आवश्यक असल्याचेही स्पष्ट केले.

उमेश शिंदे यांनी यावेळी सांगितले की, राज्यात सध्या २,९८४ विशेष शिक्षक अनेक वर्षांपासून कार्यरत आहेत. हे शिक्षक कोणतीही अपेक्षा न ठेवता दिव्यांग विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी प्रामाणिकपणे प्रयत्न करत आहेत. त्यांच्या मार्गदर्शनाखाली आज अनेक गुणवान विद्यार्थी घडले, परंतु दुर्दैवाने अद्यापपर्यंत त्यांना ना कौतुकाची थाप मिळाली, ना कोणताही सन्मान मिळाल्याचे स्पष्ट केले. तर शिक्षण मंत्र्यांना ३ डिसेंबर जागतिक दिव्यांग दिनानिमित्त राज्यस्तरावर आणि जिल्हास्तरावर हेलन केलर आणि लुईस ब्रेल पुरस्कारांच्या नावाने विशेष शिक्षक व उत्कृष्ट दिव्यांग विद्यार्थ्यांचा गौरव करण्याचा प्रस्ताव सादर केला. या मागणीवर मंत्री भुसे यांनी सकारात्मक प्रतिसाद देत शिक्षण सचिवांना पुढील कार्यवाहीचे आदेश दिले.

या भेटीवेळी पिंटू बापू अहिरे, अमोल पाटील, विकी बडगे, सुनील अहिरे, राहुल पाटील यांच्यासह अनेक शिक्षक उपस्थित होते. सर्वांनी एकमुखाने वेतनविलंबाचा निषेध नोंदवला आणि शिक्षकांच्या हक्कासाठी लढा सुरू ठेवण्याचा निर्धार व्यक्त केला.

# अपुरी झोप व अयोग्य आहाराने दृष्टीवर गंभीर परिणाम होतात

**तनवीर चष्मावाला यांचे प्रतिपादन; नि:शुल्क नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिर**



समता फाउंडेशन, एच.व्ही.देसाई नेत्र रुग्णालय पुणे, अलनूर आय केअर सेंटर व मखदूम सोसायटी यांच्या संयुक्त विद्यमाने नि:शुल्क नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिराचे मुकुंदनगर येथे आयोजन करण्यात आले होते.

नगर – आजच्या वेगवान आणि तणावग्रस्त जीवनशैलीमुळे डोळ्यांचे आजार वाढत चालले आहेत. दीर्घकाळ मोबाईल, संगणक, टीव्ही यांचा वापर, अपुरी झोप आणि अयोग्य आहार यामुळे दृष्टीवर गंभीर परिणाम होत आहेत. महागाईच्या या काळात अनेकांना नेत्र तपासणी व उपचार परवडत नाहीत. अशा परिस्थितीत सम ाजातील प्रत्येक घटकापर्यंत आरोग्य सुविधा पोहोचविण्या साठी नि:शुल्क नेत्र तपासणी शिबिरांची गरज अधिक भासते. अशा उपक्रमांमुळे अनेकांना पुन्हा प्रकाश दिसण्याची संधी मिळते, हीच खरी सामाजिक सेवा आहे, असे प्रतिपादन अलनुर आय केअर सेंटरचे तन्वीर चष्मावाला यांनी केले.

राष्ट्रीय अंधत्व निर्मूलन कार्यक्रमांतर्गत समता फाउंडेशन, एच.व्ही. देसाई नेत्र रुग्णालय पुणे, अलनूर आय केअर सेंटर व मखदूम सोसायटी यांच्या संयुक्त विद्यमाने नि:शुल्क नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिराचे मुकुंदनगर येथे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात एच. व्ही.देसाई नेत्र रुग्णालयाचे डॉ. आनंद बोज्ञा, समता फाउंडेशनचे अभिषेक शिंदे, अलनूर आय केअर सेंटरचे तनवीर चष्मावाला, शेख नूर साहब, मखदूम एज्युकेशन अँड वेल्फेअर सोसायटीचे अध्यक्ष आबीद दुलेखान, शाहनवाज तांबोली, शफकत सय्यद, रुमान शेख, रेहान शेख, हारून शेख उपस्थित होते.

शिबिरामध्ये एकूण ११७ रुग्णांची तज्ञ डॉक्टरांकडून तपासणी करण्यात आली. त्यापैकी २० रुग्णांना मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रियेसाठी पुण्याला पाठविण्याचे ठरविण्यात आले.

कार्यक्रमाचे समन्वयक म्हणून समता फाउंडेशन आणि अलनूर आय केअर सेंटर यांचे योगदान राहिले. शिबिर यशस्वीपणे पार पाडल्याबद्दल सर्व वैद्यकीय कर्मचारी व स्वयंसेवकांचे उपस्थितांनी कौतुक केले. मखदूम सोसायटीच्या माध्यमातून पुढील काळातही अशा सामाजिक आरोग्यविषयक उपक्रमांचे आयोजन करण्यात येईल, असे आश्वासन अध्यक्ष आबीद दुलेखान यांनी दिले.

सुत्रसंचालन शाहनवाज तांबोली यांनी केले. शफकत सय्यद यांनी आभार मानले.



**पद्मशाली युवाशक्तीच्या वतीने वंचित, वृद्ध आणि दिव्यांग व्यक्तींना फराळ वाटप**

पद्मशाली युवाशक्ती ट्रस्ट कडून दिवाळीच्या दिवशी वंचीत वृद्धांना फराळ वाटप करण्यात आले. या वेळी ट्रस्ट चे योगेश म्याकल, अजय म्याना, दिपक गुंडू, श्रीनिवास इप्पलपेल्ली, योगेश ताटी, सागर बोगा, सागर आरकल, सागर मेहसुनी, विराज म्याना, वेदांत म्याना उपस्थित होते.

# बुऱ्हाणनगर येथून दुचाकीची चोरी; गुन्हा दाखल

नगर – शहराजवळील बुऱ्हाणनगर येथील बाणेश्वर विद्यालय येथे उभी केलेली मोटारसायकल (क्र. एम एच १६ सीजे ५२१७) अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना २६ ऑक्टोबर रोजी सकाळी ८.४५ ते १० या कालावधीत घडली.

याबाबत अनिल गोरख शिंदे (वय ४८, रा दत्त चौक, भुषणनगर, केडगाव) यांनी भिंगार कॅम्प पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. या फिर्यादीवरून पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध बीएनएस कलम ३०३ (२) प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे.

# निरंकारी मिशनचा ३१ ऑक्टोबरपासून ७८ वा वार्षिक संत समागम

**नगर शहरासह जिल्ह्यातून हजारो निरंकारी भक्त उपस्थित राहणार**




नगर – सद्गुरु माता सुदिक्षा महाराज व निरंकारी राजपिता रमीत यांच्या पावन छत्रछायेखाली निरंकारी मिशनच्या वतीने ४ दिवसीय ७८ वा वार्षिक निरंकारी संत समागमचे आयोजन अध्यात्मिक स्थळ, समालखा, हरियाणा येथे ३१ ऑक्टोबर ते ३ नोव्हेंबर पर्यंत होणार आहे. नगर शहरसह जिल्ह्यातून तसेच अहिल्यानगर क्षेत्र अंतर्गत येणाऱ्या शाखा बीड, परभणी, हिंगोली, नांदेड, आदी ठिकाणाहून हजारो भक्त उपस्थित राहणार असल्याची माहिती मंडळाचे अहिल्यानगर विभाग प्रमुख हरीश खुबचंदानी यांनी दिली.

या आत्मीयतेच्या उत्सवात देश-विदेशातून असंख्य श्रद्धाळू सहभागी होऊन आनंदाचा आणि आध्यात्मिक अनुभवाचा लाभ घेणार आहेत. यंदाच्या समागमाचा विषय आत्ममंथनअसून चार दिवस गीत, भजन, कविता, विचार आदि च्या माध्यमातून वक्ते भक्तिच्या अनेक पैलूंवर प्रकाश टाकतील व सद्गुरू माताजी आणि निरंकारी राजपिताजी यांच्या प्रवचनरुपी अमूल्य उपहाराची तसेच दिव्य दर्शनाचा भाविक लाभ प्राप्त करतील. हा समागम केवळ एक धार्मिक किंवा वार्षिक आयोजन नसून ज्ञान, प्रेम आणि भक्तीचा असा पवित्र संगम आहे, जो ब्रह्मज्ञानाच्या माध्यमातून आत्म्याला परमात्म्याशी जोडतो. येथे श्रद्धाळू आध्यात्मिक जागृती समवेत मानवता, विश्वबंधुत्व आणि परस्पर-प्रेम या भावनाही आत्मसात करतात. हे आयोजन 'आत्ममंथना'ची ती दिव्य भूमी आहे, जिथे प्रत्येक साधक आपल्या अंतर्मनात डोकावतो, आत्मचिंतन करतो आणि आपल्या आत्मिक चेतनेला जागृत करण्याची प्रेरणा प्राप्त करतो.

हे संपूर्ण आयोजन सतगुरु माताजींच्या दिव्य प्रेरणा आणि आशीर्वादाने पार पडत आहे. सतगुरुंची हीच मंगल कामना असते, की प्रत्येक श्रद्धाळू भक्त या समागमात प्रेम, आदर आणि योग्य सुविधा अनुभवून आध्यात्मिक रूपाने समृद्ध व्हावा.

शेकडो एकर वरील मैदानावर होत असलेल्या समागम स्थळाला शामियानांच्या एक दिव्य नगरीचे स्वरूप प्राप्त झाले आहे. विशाल पंडालांमध्ये भक्तांसाठी सुव्यवस्थित बसण्याची व्यवस्था सुनिश्चित करण्यात आली आहे. समागमाच्या मुख्य मंचावर होणाऱ्या प्रेरणादायी प्रवचन, भावपूर्ण भजन, कविता आणि विचार अधिक प्रभावीपणे दर्शवण्यासाठी अत्याधुनिक एल.ई.डी. स्क्रीन संपूर्ण परिसरात बसविण्यात आल्या आहेत, ज्यामुळे दूरवर बसलेले श्रद्धाळूही त्याच भाव, ऊर्जा आणि अनुभूतीने सत्संगाचा लाभ घेऊ शकतील. संपूर्ण समागम परिसर चार प्रमुख विभागांत विभागलेला असून संचालन, आवागमन आणि सोयींचे योग्य नियोजन सुनिश्चित करण्यात आले आहे.

गतवर्षांच्या परंपरेला पुढे नेत, यंदाही मुंबईच्या श्रद्धाळू भक्तांनी तयार केलेले मुख्य स्वागतद्वार आपल्या कलात्मक भव्यतेसह समागमाच्या आध्यात्मिक रूपरेखेचे प्रतिबिंब म्हणून उदयास येत आहे. हे द्वार केवळ सौंदर्याचे प्रतीक नसून, समर्पण, सेवा आणि सृजनशीलतेचे जिवंत उदाहरण आहे. दरवर्षी वाढणाऱ्या श्रद्धाळूंच्या संख्येसह हे स्वागतद्वारही आपल्या स्वरूप, विस्तार आणि गौरव यात अधिकाधिक भव्य होत चालले आहे, जणू ते संपूर्ण मानवतेला प्रेम, आपुलकी आणि समभावाने आमंत्रित करण्यास तत्पर आहे.

या पवित्र संत समागमात सर्व सज्जनांचे आणि श्रद्धाळू भक्तांचे मनःपूर्वक स्वागत आहे. चला, या आत्मिक मिलन आणि भक्तीच्या महासंगमाचा भाग बनूया, सत्गुरुंचे दिव्य दर्शन प्राप्त करूया, त्यांच्या अमृतमय प्रवचनांचा लाभ घेऊया आणि आत्म्याला परमात्म्याशी जोडणाऱ्या या अद्वितीय प्रवासात सहभागी होऊन जीवनाला धन्य करूया. निःसंशयपणे, हा संत समागम केवळ एक आयोजन नसून आत्ममंथन, आत्मबोध आणि आंतरिक शुद्धी करण्याची एक सुवर्ण संधी आहे.



श्री माहेश्वरी युवा संघटनेच्यावतीने दिपावलीनिमित्त 'रामा-सामा' स्नेहसंमेल आयोजित करण्यात आले होते. याप्रसंगी अध्यक्ष शाम भुतडा, सचिव संकेत मानधने, सदस्य अमित खटोड, अभिनंदन कालानी, अनिकेत बलदवा, भूषण काबरा, गोविंद दरक, गोविंदा काकानी आदी.

# संमेलनातून जुन्या-नव्या पिढींच्या विचारांची देवाण-घेवाण

**अध्यक्ष शाम भुतडा यांचे प्रतिपादन; माहेश्वरी युवा संघटनेच्यावतीने दीपावली स्नेहसंमेलन 'रामा-सामा' उत्साहात**

नगर – आजच्या धावपळीच्या युगात कुटूंबाला वेळ देणे अवघड होत आहे, अशा परिस्थिती स्नेहसंमेलनानिमित्त संपूर्ण समाजाला एकत्र करण्याचा हा उपक्रम आहे. यानिमित्त जुन्या-नव्या पिढींच्या विचारांची देवाण-घेवाण होते. माहेश्वरी युवा संगठन नेहमीच समाज जोडण्यासाठी विविध उपक्रम राबवत असते. त्या माध्यम ातून गरजूंना मदत तर गुणवंतांना प्रोत्साहन मिळते. अशा संमेलनातून कुटूंबाबरोबरच समाज जोडला जात आहे. यातून एक चांगला समाज निर्माण होण्यास मदत होते. संघटनेच्या माध्यमातून युवक, महिला, ज्येष्ठ नागरिक अशा सर्वच घटकांचा विचार करुन त्यांच्या उन्नत्तीसाठी राबविण्यात येत असलेले उपक्रमातून आदर्श समाज घडेल, असे प्रतिपादन श्री माहेश्वरी युवा संघटने अध्यक्ष शाम भुतडा यांनी केले.

श्री माहेश्वरी युवा संघटनेच्यावतीने दिपावलीनिमित्त 'रामा-सामा' स्नेहसंमेल आयोजित करण्यात आले होते. याप्रसंगी अध्यक्ष शाम भुतडा, सचिव संकेत मानधने, सदस्य अमित खटोड, अभिनंदन कालानी, अनिकेत बलदवा, भूषण काबरा, गोविंद दरक, गोविंदा काकांनी, कुणाल लोया, मधुर बिहणी, पवन बंग, पियूष झंवर, प्रतीक सारडा, ऋषिकेश बजाज, संग्राम सारडा, संकेत अट्टल, शेखर असावा, सुमित बिहानी, सुमित चांडक, वेदांत बजाज आदि उपस्थित होते. कार्यक्रम श्री खाकीदास बाबा माहेश्वरी मठ, लालटकी, अहिल्यानगर येथे झाला.

प्रास्ताविकात संकेत मानधने म्हणाले, समाजातील प्रत्येक घटकांचा विकास व्हावा, त्यांच्या अडी-अडचणी दूर व्हाव्यात. यासाठी विविध उपक्रम राबविले जात असतात. त्याचप्रमाणे गुणवंतांचा सत्कार करुन त्यांना प्रोत्साहन दिले जाते. यासाठी समाजातील ज्येष्ठ व मान्यवरांचे मोठे सहकार्य मिळत असल्याने आम्हा युवकांना काम करण्यास प्रोत्साहन मिळते. दिवाळीनिमित्त रामा-सामा स्नेहसंमेलनाच्या माध्यमातून सर्व समाज एक कुटूंब म्हणून एकत्र आणण्याचा प्रयत्न केला आहे. तसेच युवक - विद्यार्थी यांचे संघटन हाती घेण्यात आला असून, पर्सनालिटी डेव्हलमेंट, स्कील डेव्हलमेंट यासाठी तज्ञांचे मार्गदर्शन मार्गदर्शन केले जात असल्याचे सांगितले.

प्रोजेक्ट चेअरमन प्रतीक सारडा, संग्राम सारडा यांनी काम पाहिले. या कार्यक्रमासाठी खाकीदास बाबा माहेश्वरी मठ च्या सर्व ट्रस्टी व लक्ष्मीनारायण सत्संग मंडळाचे सहकार्य लाभले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार संकेत मानधने यांनी मानले. यावेळी समाज बंधू-भगिनी उपस्थित होते.

# निमगाव वाघा येथे पै. नाना डोंगरे यांचे स्वच्छता अभियान व वृक्ष संवर्धनाचे कार्य



निमगाव वाघा येथील नवनाथ विद्यालयात स्व. पै. किसनराव डोंगरे बहुद्देशीय संस्थेचे अध्यक्ष तथा ग्रामपंचायत सदस्य पै. नाना डोंगरे यांनी स्वच्छता अभियान राबविले.

नगर – निमगाव वाघा (ता. नगर) येथील नवनाथ विद्यालयात स्व. पै. किसनराव डोंगरे बहुद्देशीय संस्थेचे अध्यक्ष तथा ग्रामपंचायत सदस्य पै. नाना डोंगरे यांनी स्वच्छता अभियान राबविले. या उपक्रमात शालेय परिसरातील साचलेला कचरा काढण्यात आला, झुडपे व गवत कापण्यात आले आणि झाडांना पाणी घालून त्यांचे संवर्धन करण्यात आले.

पै. नाना डोंगरे यांनी या उपक्रमाद्वारे स्वच्छ शाळा, सुंदर शाळा! हा संदेश दिला. दिवाळीच्या सुट्टीत स्वच्छतेचे महत्त्व स्पष्ट करुन, तसेच पर्यावरणाविषयी जबाबदारी निर्माण व्हावी या हेतूने त्यांनी हा उपक्रम राबवला. संस्थेच्या माध्यमातून मागील २५ वर्षांपासून पर्यावरण संवर्धन, वृक्षारोपण आणि स्वच्छता अभियानाचे सातत्याने कार्य करण्यात येत आहे. या उपक्रमात लहानू जाधव आणि आनंद गेनाप्पा यांनी देखील सहकार्य केले.

शालेय परिसर स्वच्छ आणि हिरवागार ठेवण्याच्या त्यांच्या या सातत्यपूर्ण प्रयत्नांचे कौतुक करताना मुख्याध्यापक उत्तम कांडेकर म्हणाले की, नाना डोंगरे यांचे पर्यावरण संवर्धनाचे कार्य हे समाजासाठी प्रेरणादायी आहे. त्यांच्यामुळे शाळा परिसर स्वच्छ, नीटनेटका आणि हरित वातावरणात बदल होण्यासाठी मदत होत असल्याचे ते म्हणाले.

पै. नाना डोंगरे म्हणाले की, पर्यावरणाचे रक्षण हे फक्त सरकारचे काम नाही, तर प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे. आपण शाळा, अंगण, गल्ली, गाव या सगळीकडे स्वच्छता आणि हरितता राखली, तरच भविष्यातील पिढीसाठी निरोगी वातावरण तयार होईल. एक झाड लावणे ही केवळ कृती नसून, ती समाजाप्रती आपली बांधिलकी असल्याचे ते म्हणाले.

डोंगरे यांचे संपूर्ण जिल्ह्यात डोंगरे संस्थेच्या माध्यमातून स्वच्छता अभियान सुरु असते. त्यांच्या या कार्याची दखल घेत शासनाच्या मेरा युवा भारतच्या वतीने त्यांना स्वच्छता ही सेवा पुरस्काराने सन्मानित करण्यात आलेले आहे.

# गोवंशीय जनावरांसह नगरमध्ये गोमांस पकडले; गुन्हा दाखल

नगर – नगर शहरातील बाबा बंगाली परिसरातील हमालवाडा चौक येथे कोतवाली पोलिसांच्या पथकाने २७ ऑक्टोबर रोजी दुपारी ४ च्या सुमारास छापा टाकत कत्तलीसाठी आणलेल्या गोवंशीय जनावरांची सुटका केली. तर या ठिकाणी काही गोमांस ही जप्त केले. या कारवाईत ९१ हजार ७०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

बाबा बंगाली परिसरात गोवंशीय जनावरांची कत्तल करून गोमांस विक्री केली जात असल्याची माहिती कोतवाली पोलिसांना मिळाली. या माहितीच्या आधारे पोलिसांनी हमालवाडा चौक परिसरात छापा टाकला. तेथे रऊफ गणी कुरेशी (वय ६०, रा. हमालवाडा, बाबा बंगाली) हा गोमांस विक्री करताना आढळून आला. तसेच तेथे काही गोवंशीय जनावरे कत्तल करण्याच्या उद्देशाने बांधून ठेवल्याचे आढळले.

पोलिसांनी ती जनावरे ताब्यात घेत गोमांस जप्त केले. या प्रकरणी पो.कॉ.सुरज कदम यांनी दिलेल्या फिर्यादी वरून रऊफ गणी कुरेशी याच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# अहिल्यानगरमध्ये हजारोंच्या मुखातून गुंजीत झाली महावीर स्तुती

नगर – महात्मा फुले चौकात २३ ऑक्टोबर रोजी सकाळी ६.३० वाजता 'भाऊबीजेची पवित्र प्रभात' या शिर्षकाखाली विशेष अध्यात्मिक कार्यक्रमाच्या आयोजनाद्वारे तसेच संपूर्ण भारतभर एकाचवेळी अनेक शहरात, हजारोंच्या मुखातून एकाच स्वरात महावीर स्तुती वीरस्तुतीचे स्वर गुंजायमान झाले.

एकाच वेळी सामूहिक उच्चारणामुळे निर्माण होणाऱ्या स्पंदनामुळे वातावरण शांत मंगलमय बनले होते. प्रत्येक जण म्हणत होता की असा कार्यक्रम पुन्हा झाला पाहिजे. आनंद, समृध्दी व सकारात्मकतेचा संदेश देणारी महावीरांची ही मंगलस्तुती केवळ धार्मिक प्रार्थनाच नाही तर आत्मशुद्धी व मांगल्याच्या दिशेने एक अध्यात्मिक चळवळ आहे.

आचार्यश्री आनंदऋषीजी म.सा. यांच्या आशीर्वादाने तसेच अर्हम् विज्ञा प्रणेता उपाध्याय प्रवीणऋषीजी म.सा. यांच्या प्रेरणा व संकल्पनेतून जितेश्वरी पारायण ग्रुप, अहिल्यानगर द्वारा आयोजित कार्यक्रमाचा लाभ २००० हून अधिक भक्तांनी घेतला.

भगवान महावीरांनी सांगितलेला धर्म कुठल्याही जाती-धर्मात बंदीस्त नसून परस्परोपग्रह जीवाणम् था विश्वातील प्रत्येक जीव । प्रत्येक प्राणी सुखी व्हावा असा आहे व तो प्रत्येक प्राणीमात्रापर्यंत पोहचावा हे ध्येय, हे स्वप्न ध्यास, ध्यानी, मनी, स्वप्नी आहे. अशा उपाध्याय भगवानांच्या प्रेरणेतून हा कार्यक्रम कुठल्याही धर्मस्थानकात न करता महात्मा फुले चौकात आयोजित करण्यात आला होता, जेणेकरून चारही दिशेने येणारी कुठलीही व्यक्ती या आयोजनात सहभागी होऊ शकेल, या भक्तीचा लाभ घेवू शकेल.

श्री प्रवीणऋषीजी म.सा. यांच्या संकल्पनेतून अ.नगर येथील बाबुशेठ बोरा, उपमहापौर गणेश भोसले, प्रकाश भागानगरे, भगवान फुलसौदर, संजय चोपडा, श्रीमती मीनाताई मुनोत, मीनाताई चोपडा, विपुलजी शेटीया, श्रीमती पार्वतीलाई जगताप, गीतांजली काळे, हेमा सेलोत, अ.नगर व उपनगरातील सर्व जैन धर्मस्थानकांचे अध्यक्ष आदींच्या उपस्थितीत हा भक्तीमय कार्यक्रम पार पडला.



भाऊबीजेच्या दिवशी अहिल्यानगर शहरामध्ये हजारोच्या मुखातून गुंजीत झाली महावीर स्तुती झाली.

